पश्चिम विदर्भातील सर्वाधिक अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला

● वर्ष १६ ● अंक ७६ ●सोमवार, दि. २१सप्टेंबर २०२६ ● मूल्य ५ ● पृष्ठे ८

RNI No.- MAHMAR/2012/49642 Postal Regn. No. AKL DN/283/2024-26 Web. https://epaper.citynewssuperfast.com

## »थोडक्यात

### उद्योगपतींची 10 लाख कोटींची कर्जे माफ!

दिल्ली : सरकार शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी विविध योजनांच्या घोषणा करत असले आणि त्यांच्याबद्दल सहानुभूती दाखवत असले, तरी सरकारी आकडेवारीनेच एक धक्कादायक वास्तव समोर आणले आहे. २०१४ ते २०२६ या १२ वर्षाच्या काळात केंद्र सरकारने उद्योगपती आणि कॉर्पोरेट क्षेत्राचे तब्बल १० लाख कोटी रुपयांचे कर्ज माफ केले आहे, तर याच काळात शेतकऱ्यांसाठी एक रुपयाचीही कर्जमाफी दिलेली नाही.

### राज ठाकरेंवर वादग्रस्त टिप्पणी पडली महागात!

पुणे : महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांच्या विरोधात आक्षेपार्ह टिप्पणी करणे सोशल मीडिया इन्फ्लुएंसर महेश मोटे याला चांगलेच महागात पडले. मनसे कार्यकर्त्यांनी महेश मोटेला चांगलाच दम देत त्याच्या तोंडाला काळा रंग फासला आहे. तसेच राज ठाकरेंच्या फोटोसमोर नाक घासायला लावून त्याला माफी मागायला लावल्याचा प्रकार पुण्यात घडला आहे.

# मंत्र्यांना काजू-बदाम, तर बळीराजाकडून वसुली!




## शिवारफेरीत भेदभाव; दुष्काळात प्रशासनाचा संतापजनक कारभार

प्रवीण वानखडे २१ सप्टेंबर

**अकोला:** पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे खरीप पिके संकटात सापडलेली असताना आणि शेतकरी अस्मानी व सुलतानी संकटाचा सामना करत असताना, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात आयोजित खरीप शिवारफेरीमध्ये एक अत्यंत संतापजनक आणि भेदभाव करणारा प्रकार उघडकीस आला आहे. या कार्यक्रमासाठी आलेल्या मंत्र्यांसह व्हीआयपी पाहुण्यांसाठी मोफत मेजवानी आणि पंचपक्वात्रांची जय्यत व्यवस्था करण्यात आली, मात्र दुसरीकडे दिवसभर राबणाऱ्या सर्वसामान्य, हवालदिल शेतकऱ्यांकडून जेवणासाठी



९० रुपये प्रति थाळीप्रमाणे पैसे वसूल करण्यात आल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे.

गेल्या सलग दोन वर्षांत आयोजित शिवारफेरीमध्ये सहभागी होणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना विनामूल्य जेवण दिले जात होती, ही एक प्रकारची परंपराच बनली होती. मात्र, यंदा दुष्काळी परिस्थिती असताना प्रशासनाने अचानक हा नियम बदलत मंत्र्यांना मोफत जेवण दिले आणि आधीच आर्थिक संकटात असलेल्या शेतकऱ्यांच्या खिशाला कात्री लावली. या दुजाभत्वामुळे बळीराज्यात तीव्र संताप उसळला आहे. एकीकडे शेतकऱ्यांच्या हिताच्या गोष्टी करायच्या आणि दुसरीकडे त्यांच्याकडूनच पैशांची वसुली करायची, या दुहेरी धोरणाबद्दल शेतकऱ्यांनी तीव्र निषेध व्यक्त केला आहे. छत्रपती संभाजीनगर येथील दूष्काळच्या बैठकीत मंत्र्यांनी काजू व बदामवर ताव मारला पण, अकोल्यात मात्र शिवार फेरीत आलेल्या शेतकऱ्यांच्या जेवणाची व्यवस्था कृषी विद्यापीठाने केली नाही. गेले दोन वर्षे कशी मोफत व्यवस्था केली यंदा काय झाले असा गंभीर प्रश्न शेतकऱ्यांनी विचारला.

### शिवारफेरीकडे शेतकऱ्यांची पाठ

दुसरीकडे, पावसाने ओढ दिल्याने अकोला जिल्ह्यासह विदर्भातील अनेक भागांत खरीप पिकांची अवस्था गंभीर झाली आहे. सोयाबीनसह पिके वाळत असताना शेतकरी आर्थिक मदतीच्या प्रतीक्षेत आहेत. अशा बिकट परिस्थितीत शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष समस्या सोडविण्यावर भर देण्याऐवजी शिवारफेरीसारख्या कार्यक्रमाचे आयोजन करून लाखो रुपयांची उधळपट्टी करण्यावर शेतकऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. ‘शेतात पिके वाळत आहेत, शासनाने तात्काळ दुष्काळ जाहीर करून आर्थिक मदत द्यावी,’ अशी मागणी शेतकऱ्यांनी केली. आयोजकांनी मोठ्या उपस्थितीचा दावा केला असला, तरी प्रत्यक्षात पहिल्या व दुसऱ्या दिवशी शेतकऱ्यांचा अत्यल्प प्रतिसाद पाहायला मिळाला.

### कुलगुरूंचा दावा विरुद्ध वस्तुस्थिती

दरम्यान, याउलट प्रतिक्रिया देताना कुलगुरू शरद गडदख यांनी सांगितले की, मागील वर्षीच्या तुलनेत यंदा दुष्काळी वर्ष असले तरी शिवारफेरीत सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांच्या संख्येत मोठी वाढ झाली असून, चार-चार जिल्ह्यांच्या अचूक नियोजनामुळे



तुडुंब गर्दी पाहायला मिळत आहे असा दावा कृषी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.शरद गडाख यांनी केला आहे. शेतकऱ्यांच्या जेवणाची व्यवस्थेवर कुलगुरु मात्र काही बोलले नाही. प्रत्यक्षात ९० रुपयांची थाळी सक्तीची केल्याने आणि दुष्काळाच्या झळा सोसणाऱ्या शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास हिरावून घेतल्याने प्रशासनाविरोधात संतापाची लाट आहे. शिवारफेरीत येण्यापेक्षा शासनाने आमच्या शेतातील पिके वाचविण्याची धडपड करावी, अशी संतप्त प्रतिक्रिया शेतकरी देत आहेत.

# गणेशोत्सवातून देशभक्तीचे चैतन्य निर्माण होते - अमित आझाद

## माळीपुरा येथे शहीद चंद्रशेखर आझाद गणेशोत्सव मंडळात उत्साहात महाआरती संपन्न

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**अकोला :** शहरातील ऐतिहासिक आणि प्रसिद्ध माळीपुरा भागातील 'शहीद चंद्रशेखर आझाद गणेशोत्सव मंडळात' सार्वजनिक गणेशोत्सवाचा उत्साह सध्या शिगेला पोहोचला आहे. बाप्पाच्या दर्शनासाठी आणि सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घेण्यासाठी परिसरातील भाविकांची व नागरिकांची तुडुंब गर्दी होत आहे. या मंडळाच्या वतीने यंदा गणेशोत्सवाच्या निमित्ताने विविध धार्मिक, सांस्कृतिक आणि प्रेरणादायी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, नुकताच अतिशय भक्तिमय व देशभक्तीपर वातावरणात महाआरतीचा भव्य सोहळा पार पडला.





या विशेष कार्यक्रमाचे सर्वात मोठे आकर्षण म्हणजे देशाचे महान क्रांतिकारक, अमर हुतात्मा शहीद चंद्रशेखर आझाद यांच्या प्रतिमेचे पूजन करून त्यांना आदरांजली वाहणे हे ठरले. बाप्पाच्या अफाट भक्तीसोबतच शहीद आझाद यांच्या अमर बलिदानाला आणि त्यांच्या क्रांतिकारी विचारांना उजाळा देत हा उत्सव साजरा केला जात आहे. या महाआरती प्रसंगी शहीद चंद्रशेखर आझाद यांचे नातू अमित आझाद तिवारी आणि यावेळी पोलिस अधीक्षक अर्चित चांडक यांच्यासह आर. आर. सी. ग्रुपचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांची विशेष उपस्थिती लक्षवेधी ठरली.

यावेळी उपस्थितांना मार्गदर्शन करताना अमित आझाद म्हणाले की, 'गणेशोत्सवासारखे सार्वजनिक उत्सव केवळ धार्मिक विधीपुरता मर्यादित नसून, त्यातून समाजात देशभक्तीचे आणि राष्ट्रीय एकात्मतेचे खरे चैतन्य निर्माण होते. शहीद आझाद यांचे विचार तरुण पिढीमध्ये रुजविण्याचे मोठे कार्य अशा उत्सवांच्या माध्यमातून होते.' तसेच, या प्रसंगी आपले मनोगत व्यक्त करताना आर. आर. सी. ग्रुपचे कार्यकारी संचालक पंकज देशमुख यांनी सुद्धा उपस्थितांशी संवाद साधला. ते म्हणाले, 'क्रांतिकारकांच्या विचारांचा वारसा पुढे चालवणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे. माळीपुरा येथील या मंडळाने बाप्पाच्या आराध्यतेसोबतच देशप्रेमाचा जो संदेश दिला आहे, तो अत्यंत प्रेरणादायी आहे.'

मंत्रोच्चार, पारंपरिक वाद्यांचा गजर आणि 'गणपती बाप्पा मोरया' च्या जयघोषात पार पडलेल्या या महाआरतीने संपूर्ण माळीपुरा परिसरातील वातावरण भक्तिमय आणि देशभक्तीने भारून टाकले होते. आरतीच्या मंगलमय सोहळ्यानंतर उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वितरण करण्यात आले. मंडळाच्या या स्तुत्य उपक्रमामुळे नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह असून, या आगळ्या वेगळ्या गणेशोत्सवाची शहरभर जोरदार चर्चा रंगली आहे.

# कॉन्ट्रक्टर विरोधात गुन्हा दाखल

## हॉट मिक्स प्लॅट बंद असतानाही लाटली निविदा

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**अकोला :** अकोल्यात सार्वजनिक बांधकाम विभागाची दिशाभूल करून बनावट प्रमाणपत्राच्या आधारे निविदा लाटणाऱ्या अमरावतीच्या कंत्राटदाराविरुद्ध अखेर सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणात सिटी न्यूज सुपरफास्ट आणि आर आर सी न्यूज ने वस्तुनिष्ठ बातमी प्रसारीत केल्यानंतर बांधकाम विभागाने हा गुन्हा दाखल केला आहे.



अकोला सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत रस्ता कामाकरिता ई-निविदा सूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. या निविदेच्या अटीनुसार कंत्राटदाराकडे 'ड्रम मिक्स प्लॅंट' कार्यरत स्थितीत असणे अनिवार्य होते. मात्र, अमरावतीच्या मे. जी. एच. खंडेलवाल या कंत्राटदाराने प्रत्यक्षात कार्यक्षम स्थितीत नसलेला प्लॅंट कार्यरत असल्याचे भासवून खोटे व वस्तुस्थितीशी विसंगत प्रमाणपत्र निविदेसोबत सादर केले. शासकीय कार्यालयाची दिशाभूल करून कंत्राट मिळवल्याप्रकरणी कार्यकारी अभियंता कार्यालयाच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे उपविभागीय अभियंता राजेश राठोड यांच्या फिर्यादीवरून ही कायदेशीर कारवाई करण्यात आली असून, या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक अनिल हरदास इंगोले करत आहेत. कायदेशीर कागदपत्रांमध्ये फेरफार करणे किंवा खोटी कागदपत्रे तयार करण्यात खंडेलवाल गुंतले होते. त्याच बरोबर फसवणूक करताना त्याची माहिती खंडेलवाल यांना असल्याचा आरोप करण्यात आला आहे. अमरावतीचे जी.एच. खंडेलवाल यांच्या विरोधात गुन्हा दाखल केल्याने कॉन्ट्रक्टर मध्ये चांगलीच खळबळ माजली आहे. आता खंडेलवाल यांना देण्यात आलेले काम रद्द होते काय हे पाहण्यासारखे असेल. त्याच बरोबर खंडेलवाल यांच्या दाव्यांची खात्री न करता त्यांना काम देणाऱ्यांचे काय असा प्रश्न उपस्थित होत आहे.

# राज्यात दुष्काळाची दाहकता वाढली!

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

पुणे : यंदा राज्यातील अनेक भागांमध्ये पुरेसा पाऊस न पडल्याने दुष्काळाचे संकट उभे ठाकले आहे. ही परिस्थिती ओळखून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सर्व जिल्ह्यांच्या पालकमंत्र्यांना आपापल्या भागातील दुष्काळी परिसरात जाऊन आढावा घेण्याचे आदेश दिले होते. आता राजकारणाचा आणि आपातकालीन परिस्थितीत प्रशासकीय यंत्रणा हाताळण्याचा प्रचंड अनुभव असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक शरद पवार यांनी २८ सप्टेंबरपासून दुष्काळी भागाचा दौरा करण्याचा निर्णय घेतला आहे.

शरद पवार यांनी काही दिवसांपूर्वीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून राज्यात कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी केली होती. दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये ही मदत सुध्दा जाहीर करावी, अशी मागणी या पत्रात शरद पवार यांनी केली होती.






# सेवा संकल्प अभियान : जनमनाचे समाधान

राज्य शासनाचा प्रत्येक विभाग १७ सप्टेंबरपासून 'सेवा संकल्प अभियान' या लोकाभिमुख अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अग्रेसर झाला आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांचा सहभाग वाढविणे, त्यांच्या सहभागाचे कौतुक करणे आणि शासन नागरिकांच्या पाठीशी असल्याची भावना दृढ करणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे. 'सेवा संकल्प अभियान' विषयी ही माहिती.

देशाचे प्रधानमंत्री श्री नरेंद्र मोदी यांच्या संवैधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने, त्यांच्या कार्यकाळात 'सेवा परमो धर्मः' या भावनेतून सामान्य नागरिकांपर्यंत सेवा पोहोचविण्याच्या प्रयत्नांना अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडून विविध सेवा उपक्रम राबविले जात आहेत. याच निमित्ताने महाराष्ट्र शासनाने १७ सप्टेंबर २०२६ ते १७ ऑक्टोबर २०२६ या महिनाभराच्या कालावधीत राज्यात 'सेवा संकल्प अभियान' राबविण्याचा निर्णय घेतला आहे. हे अभियान म्हणजे कार्यक्रमांची फक्त रेलचेल नसून, शासकीय सेवा आणि योजना सामान्य माणसाच्या अधिक जवळ आणि दारापाशी नेण्याचा हा जोरकस प्रयत्न आहे.'सेवा परमो धर्मः' ही केवळ एक उक्ती नाही, तर सामान्य माणसाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणण्याची भावना आहे. शासनाच्या योजना तयार होतात, निर्णय घेतले जातात; मात्र त्यांचा खरा अर्थ तेव्हा अधोरेखित होतो, जेव्हा त्या योजनांचा लाभ गावातील सामान्य कुटुंबापर्यंत, शेतकऱ्यांपर्यंत, महिलांपर्यंत, विद्यार्थ्यांपर्यंत आणि गरजू व्यक्तींपर्यंत पोहोचतो. राज्यातले प्रशासन १७ सप्टेंबरपासून 'सेवा संकल्प अभियान' या लोकाभिमुख अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी अग्रेसर झाले आहे. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविणे, नागरिकांचा सहभाग वाढविणे, त्यांच्या सहभागाचे कौतुक करणे आणि शासन नागरिकांच्या पाठीशी असल्याची भावना दृढ करणे, हा या अभियानाचा प्रमुख उद्देश आहे.

### लोकाभिमुख प्रशासनाची कास

गावातील सामान्य नागरिकाला प्रमाणपत्र हवे असेल, शेतकऱ्याला जमिनीची नोंद अद्ययावत करायची असेल किंवा एखाद्या गरीब कुटुंबाला शासकीय योजनेचा लाभ घ्यायचा असेल, अशा वेळी अनेकदा विविध कार्यालयांमध्ये फेऱ्या माराव्या लागु शकतात. सेवा संकल्प अभियानात ही प्रक्रिया शक्य तितकी सोपी करण्यावर भर देण्यात आला आहे. महसुली विभागामार्फत प्रत्येक तालुक्यात 'सेवा सेतू' शिबिरे आयोजित करून विविध शासकीय योजनांचे लाभ पात्र नागरिकांना उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. म्हणजेच अनेक सेवा एकाच ठिकाणी मिळण्याची सुविधा निर्माण होणार आहे.

### शिबिरांमुळे कामे गतीमान

'सेवा सेतू' शिबिरांमध्ये फेरफार नोंदींचा निपटारा, स्वामित्व सनद, शेतपाणंद रस्ते, शिधापत्रिका, नॉन-क्रिमिलेयर प्रमाणपत्र, वनहक्क दावे, नळजोडणी, वीज जोडणी, दिव्यांग प्रमाणपत्र, विवाह नोंदणी, आधार, जन्म-मृत्यू प्रमाणपत्र, शिकाऊ वाहनचालक परवाना, महिला बचत गट नोंदणी, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र तसेच ७/१२ आणि ८-अ नोंदी अद्ययावत करण्यासारख्या सेवा जनतेला उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.

### गावातच सेवा आणि समाधान

सेवा संकल्प अभियानाचा विशेष भर ग्रामीण भागावरही आहे. प्रत्येक गावात आणि वॉर्डात स्थानिक गरजेनुसार 'सेवा माझे योगदान' उपक्रम राबविण्यात येणार आहेत. गावातील युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींना यामध्ये सहभागी करून घेतले जाणार आहे. गाव स्वच्छ ठेवणे, नदीघाट आणि बारवांची स्वच्छता करणे, वृक्षारोपण करणे, रक्तदान करणे, आरोग्य तपासणी शिबिर घेणे, प्लास्टिकमुक्तीची जनजागृती करणे, जलसंधारण करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, रस्ते सुरक्षेबाबत जागृती करणे अशा अनेक उपक्रमांना या माध्यमातून चालना मिळणार आहे.

### शासन, सेवा आणि समाजविकास

शासनाची सेवा आणि समाजाचा सहभाग एकत्र आला, तर गावाचा विकास अधिक वेगाने होऊ शकतो. ही वस्तुस्थिती आहे. ग्रामीण भागातील नागरिकांसाठी जमीन आणि महसूल विषयक कागदपत्रे अत्यंत महत्त्वाची असतात. फेरफार नोंदी, ७/१२, ८-अ, स्वामित्व सनद, वनहक्क दावे यांसारख्या बाबी अनेकांच्या दैनंदिन जीवनाशी जोडलेल्या आहेत. त्याचे महत्त्व प्रत्येकाच्या आयुष्यात खुप जास्त आहे. वनहक्क दाव्यांच्या बाबतीत नवीन दावे स्वीकारणे, जुन्या दाव्यांमधील दुरुस्ती करणे आणि पात्र दावे निकाली काढण्याची प्रक्रिया अभियानाच्या कालावधीत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

### अंगणवाडीत मुख्य उत्सव

लहान मुले आणि त्यांच्या मातांसाठीही या अभियानांतर्गत विशेष उपक्रम राबविण्यात येणार आहे. 'अंगणवाडी उत्सव' अंतर्गत अंगणवाडी केंद्रांवर मुलांसोबत मातांना आमंत्रित करून महिलांना आरोग्य आणि पोषणविषयक योजनांची माहिती देण्यात येणार आहे. मुलांसाठी मनोरंजनाचे कार्यक्रम, फळे व मिठाईचे वाटप आणि अंगणवाडी सेविका, मदतनीस व आशा कार्यकर्त्यांचा सन्मान करण्याच्या उपक्रमाचा समावेश या अभियानात करण्यात आला आहे.

### नव्या कल्पनांना व्यासपीठ

आज ग्रामीण भागातील तरुणांकडे अनेक चांगल्या कल्पना आहेत. शेती, पाणी, शिक्षण, आरोग्य, रोजगार, तंत्रज्ञान अशा अनेक क्षेत्रांत ते नवे प्रयोग करू शकतात. योग्य संधी आणि व्यासपीठ मिळाले, तर या कल्पना मोठ्या बदलाचे कारण ठरू शकतात.सेवा संकल्प अभियानात राज्यातील युवा, विद्यार्थी, स्टार्टअप्स, व्यावसायिक, कॉर्पोरेट इनोव्हेटर्स आणि ग्रामीण भागात नवे प्रभावी उपाय विकसित करणाऱ्या व्यक्तींना जोडण्यासाठी 'इनोव्हेशन चॅलेंज' आयोजित करण्यात येणार आहे. शैक्षणिक संस्था, स्टार्टअप नेटवर्क, इन्क्युबेशन सेंटर आणि खासगी कंपन्यांचाही सहभाग घेतला जाणार आहे. निवडलेल्या कल्पनांना तज्ज्ञांसमोर सादरीकरणाची संधी मिळणार आहे.

### विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना दिशा

देशाचे भविष्य वर्गखोल्यांमध्ये घडत असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनाही या अभियानाशी जोडण्यात आले आहे. 'विकसित भारत' आणि 'मुलांच्या स्वप्नातील भारत' या विषयांवर शिक्षण विभागामार्फत चित्रकला आणि वक्तृत्व स्पर्धा घेण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या कल्पना आणि स्वप्नांना व्यासपीठ देण्याचा हा प्रयत्न आहे.

### लाभार्थ्यांच्या घरी 'आशीर्वादाचा दिवा'

विविध योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळालेल्या निवडक लाभार्थ्यांच्या घरी जाऊन दीप प्रज्वलित करणे, हा या उपक्रमामागील उद्देश आहे. शासकीय योजनांचा लाभ एखाद्या कुटुंबाच्या घरात पोहोचतो, तेव्हा त्या योजनेला खरा अर्थ प्राप्त होतो. त्या समाधानाच्या क्षणाला प्रकाशमान करणारा 'आशीर्वादाचा दिवा' हा उपक्रम या अभियानात आयोजिला जात आहे.

### सकारात्मक बदलाची गोष्ट

'बदलाची गोष्ट' या उपक्रमातून विविध योजनांमुळे नागरिकांच्या जीवनात झालेला सकारात्मक बदल त्यांच्या स्वतःच्या शब्दांत समाजासमोर आणला जाणार आहे. त्यांच्या अनुभवांचे व्हिडिओ आणि रील्सच्या माध्यमातून संकलन करण्यात येणार आहे.

### सेवा संकल्पाचे खरे उद्दिष्ट

सेवा संकल्प अभियानातील प्रत्येक उपक्रमामागे वेगवेगळी उद्दिष्टे असली, तरी त्यामागची भावना एकच आहे-सामान्य नागरिकाला सेवा मिळविण्यासाठी अधिक सोपे, सुलभ आणि जवळचे वातावरण निर्माण करणे.१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर या काळात प्रशासन आणि सामान्य नागरिक यांच्यातील संवाद व लोकसहभाग वाढविणारा ठरणार आहे. 'माहितीअभावी पात्र व्यक्ती वंचित राहता कामा नये', ही या उपक्रमामागील प्रमुख भूमिका आहे. शासनाचे सर्व विभाग अत्यंत उत्साहाने आणि पुढाकाराने उपक्रमशील झाले आहेत. गाव - तालुका - जिल्हा या सर्वच पातळ्यांवर सेवा संकल्प अभियान लोकहिताचे आणि जनसामान्यांचे जीवनमान अधिक सुकर करण्यासाठीचे शासनाचे लोकाभिमुख अभियान ठरणार आहे यात शंका नाही.

**विभागीय माहिती** कार्यालय, अमरावती

# गणपती Special... अंकातून व्यक्तिमत्त्वाचा शोध

## मूलांक 6 — प्रेम देणारे मन... सौंदर्य निर्माण करणारी ऊर्जा!




काही माणसं आयुष्यात आली की वातावरणच बदलून जातं... त्यांच्या बोलण्यात आपुलकी असते, वागण्यात प्रेम असतं, आणि व्यक्तिमत्त्वात एक वेगळंच आकर्षण असतं. अशा व्यक्तींमध्ये मूलांक ६ ची ऊर्जा दिसते, असं अंकशास्त्रात मानलं जातं.

६, १५ किंवा २४ तारखेला जन्मलेल्यांचा मूलांक ६ असतो. या अंकाचा संबंध शुक्राशी (Venus) जोडला जातो—प्रेम, सौंदर्य, कला, आकर्षण, सुख-सुविधा आणि भावनिक समृद्धी यांच्याशी. पण मूलांक ६ ची गोष्ट फक्त सौंदर्याची नाही... ही गोष्ट आहे प्रेम देण्याची, नाती जपण्याची आणि स्वतःच्या भावनांमधून इतरांना समजून घेण्याची.

**मूलांक ६ — मनाने खूप श्रीमंत**

मूलांक ६ असलेली व्यक्ती अनेकदा इतरांच्या गरजा स्वतःच्या आधी ठेवते. कुणी दुःखी असेल तर त्यांना जाणवतं... कुणाला मदत हवी असेल तर ते पुढे येतात... आणि नातं जपायचं असेल तर खूप काही सहनही करतात. त्यांच्यात असू शकतात—

प्रेम • करुणा • आकर्षण • सर्जनशीलता • भावनिक बुद्धिमत्ता • कुटुंबाची ओढ • सौंदर्यदृष्टी त्यांचं एक वैशिष्ट्य म्हणजे - ते फक्त सुंदर दिसणाऱ्या गोष्टींकडे आकर्षित होत नाहीत; सुंदर अनुभव आणि सुंदर नाती निर्माण करण्याचीही त्यांची इच्छा असते.

**प्रसिद्ध मूलांक ६ व्यक्तिमत्त्वे**

सचिन तेंडुलकर — २४ एप्रिल २४ = २ + ४ = ६ सचिन तेंडुलकर यांच्या प्रवासात कौशल्यासोबत संयम, सातत्य आणि नम्रता दिसते. प्रचंड यश मिळूनही स्वतःच्या कामाशी असलेली निष्ठा आणि शांत स्वभाव ही त्यांच्या व्यक्तिमत्त्वाची विशेष बाजू मानली जाते. यश मोठं असलं तरी व्यक्तिमत्त्वात नम्रता राहू शकते—ही मूलांक ६ ची सुंदर बाजू. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम — १५ ऑक्टोबर १५ = १ + ५ = ६ विज्ञान, ज्ञान आणि देशसेवेला समर्पित असलेला त्यांचा प्रवास अनेकांसाठी प्रेरणादायी ठरला. त्यांच्या व्यक्तिमत्त्वात बुद्धिमत्ता आणि साधेपणासोबत माणसांशी जोडलेपण जाणवत असे.

माधुरी दीक्षित — १५ मे - अभिनय, नृत्य, सौंदर्य आणि graceful personality—मूलांक ६ च्या Venus energy शी जोडल्या जाणाऱ्या अनेक गुणांचे सुंदर उदाहरण.

**आलिया भट्ट — १५ मार्च**

अभिनयातील विविधता, creativity आणि बदलत्या भूमिकांशी जुळवून घेण्याची क्षमता त्यांच्या प्रवासात दिसते.

दलाई लामा — ६ जुलै - करुणा, शांतता आणि मानवतेचा संदेश यांमुळे त्यांचे व्यक्तिमत्त्व जगभर ओळखले जाते.

**BOONS — मूलांक ६ ची वरदानं**

आकर्षक व्यक्तिमत्त्व प्रेमळ आणि caring nature कुटुंबाशी घट्ट नातं कला आणि creativity सुंदर communication Luxury & aesthetics ची आवड भावनिक खोली इतरांना भावनिक आधार देण्याची क्षमता

**CURSES — याच प्रेमाची दुसरी बाजू**

कधी कधी... इतरांसाठी खूप देणं स्वतःकडे दुर्लक्ष जास्त प्रेम अपेक्षा आणि emotional overthinking विश्वासघात पुन्हा विश्वास ठेवण्याची भीती सगळ्यांना खुश ठेवण्याची इच्छा "नाही" म्हणता न येणं Comfort आणि luxury अनावश्यक खर्च म्हणून मूलांक ६ साठी एक महत्त्वाचा धडा- "प्रेम करा... पण स्वतःला हरवून नाही."

**एक छोटीशी शायरी...**

"जिस दिल में सबके लिए जगह होती है,
कभी-कभी वही दिल सबसे ज्यादा अकेला होता है...
इसलिए दूसरों को प्यार देने से पहले,
खुद से प्यार करना भी सीखिए।"

मूलांक ६ ची खरी ताकद म्हणजे प्रेम देण्याची क्षमता. पण त्यांची खरी प्रगती तेव्हा होते, जेव्हा ते शिकतात—इतरांची काळजी घेताना स्वतःचीही काळजी घ्यायची.

**Lifestyle & Career**

मूलांक ६ ला सुंदर वातावरण, चांगली quality, कला, संगीत, fashion, creativity आणि आरामदायी जीवनशैली आकर्षित करू शकते. Career मध्ये कला, अभिनय, design, beauty, fashion, hospitality, teaching, counselling, public relations, luxury आणि creative fields यांसारख्या क्षेत्रांकडे ओढ असू शकते. पण एक गोष्ट महत्त्वाची— Comfort हवं... पण financial discipline देखील हवं.

**मूलांक ६ ची खरी कहाणी...**

तुम्ही फक्त सुंदर जीवन जगण्यासाठी आलेले नाही... तुमच्या प्रेमाने आणि संवेदनशीलतेने इतरांचं जीवनही सुंदर करण्याची क्षमता तुमच्यात आहे. पण लक्षात ठेवा- "स्वतःला जपणं स्वार्थीपणा नाही... ते स्वतःवर केलेलं प्रेम आहे."

**महत्त्वाची सूचना**

फक्त मूलांकावरून संपूर्ण व्यक्तिमत्त्व ठरवता येत नाही. पूर्ण जन्मतारीख, इतर अंक आणि ६ ची पुनरावृत्ती यांचाही विचार केला जातो. अंक फक्त संख्या नाहीत... प्रत्येक अंकामागे एक स्वभाव, एक संघर्ष आणि एक कहाणी असते.

**तुमचा मूलांक ६ आहे का?**

तुमच्यातील कोणता गुण तुम्हाला सर्वात जास्त जाणवतो? Comment मध्ये नक्की सांगा.




सीमा बक्षी
अकोला
मो. नं. 9834571153


# श्री. क्षेत्र लाखोंडा : परमसंत श्री. परमहंस परशराम महाराजांच्या भक्तीचे अखंड दीपस्थान

**अमरावती :** महाराष्ट्रभूमीत संतपरंपरेची अखंड गंगा वाहत राहिली आहे. त्याच पवित्र परंपरेत एक दिव्य ज्योत प्रकट झाली — श्री परमहंस परशराम महाराज. त्यांच्या लीलामय चरित्रात अनेक श्रीक्षेत्रे उजळून गेली, परंतु त्यांच्या भक्ती-भावनेचे सर्वाधिक जिवंत व सक्रिय केंद्र आजही श्री क्षेत्र लाखोंडा

येथे स्पंदत आहे. जिल्हा अकोला येथील या छोटेखानी पण परमपावन गावाने महाराजांच्या जन्मोत्सव, पुण्यतिथी उत्सवामध्ये दहा ते पंधरा पोते गव्हाच्या पोळ्यांचा भंडारा होतो व तसेच मासिक पारायण यांना आपल्या प्राणात सामावून घेतले आहे. लाखोंडा हे केवळ एक गाव नाही; ते महाराजांच्या कृपादृष्टीचे साक्षात मंदिर आहे.

सन १९०० मध्ये बुद्ध पौर्णिमेच्या शुभ दिवशी, श्रीक्षेत्र जळतापूर (तालुका भातकुली, जिल्हा अमरावती) येथे स्वर्गीय बळीरामपंत वडनेरकर (गुरव) व स्वर्गीय भिमाबाई बळीरामपंत वडनेरकर यांच्या घरी साक्षात शिवशंकर अवतरले. जन्मताच लिहिला दाखवणारे ते बालक बालवयातच भटकंती करू लागले. विविध श्रीक्षेत्रांवर त्यांनी लीला केल्या. होळी पौर्णिमा सन १९५१ मध्ये श्रीक्षेत्र इंझा (वनश्री) — त्याकाळी अकोला जिल्ह्यातील कारंजा (लाड) तालुक्यात, आज वाशिम जिल्ह्यात — येथे त्यांनी वैकुंठगमन केले. एकूण एक्वन्न वर्षे त्यांनी भक्तांना भक्ती, समता व दिव्य अनुभवाचा संदेश दिला.

महाराजांचा जास्त कार्यकाळ श्रीक्षेत्र पिंपळोद येथे गेला. तेथे स्वर्गीय भक्त देशमुख व इतर भक्तांच्या आग्रहास्तव त्यांची संजीवन समाधी आहे. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेजवळ प्रशस्त मंदिर उभे आहे. पिंपळोद ते येवदा रोडवर महाराजांनी निर्माण केलेल्या अमृतमय जलकुंडाजवळ स्वर्गीय डोरस गुरुजींच्या पुढाकाराने व श्री अशोकराव भारसाखळे यांचे स्वर्गीय चिरंजीव यांच्या निरंतर भक्तीने सुबक मंदिर उभारले गेले आहे. ही सर्व स्थाने महाराजांच्या लीलांची साक्ष देतात.

परंतु श्री क्षेत्र लाखोंडा हे आज महाराजांच्या भक्तिपरंपरेचे सर्वाधिक सक्रिय व भावपूर्ण केंद्र बनले आहे. येथील मंदिराचे अध्यक्ष सन्माननीय शंकररावजी खवले यांच्या मार्गदर्शनाखाली सर्व ट्रस्टी, गावकरी व भक्तजन एकत्र येतात.

महाराजांचा जन्मोत्सव, पुण्यतिथी, मासिक पारायण व इतर उत्सव येथे मोठ्या भक्तिभावाने साजरे होतात. गावातील सासरवासीनी मुली आई-वडिलांकडे दिवाळीला न येताही महाराजांच्या उत्सवासाठी आवर्जून धावत येतात. लहान-मोठे सर्व गावकरी उत्साहात सहभागी होतात. लाखोंडा येथे महाराज केवळ पूज्य नव्हेत; ते गावाचे प्राण आहेत, त्यांचे संस्थान गावाच्या हृदयात धडधडते.

श्री. परमहंस परशराम महाराजांनी विविध लीला व चमत्कार करून भक्तांना भक्तीचा व समानतेचा संदेश दिला. त्या संदेशाचे साक्षात रूप आज लाखोंडा येथे दृग्गोचर होते. जिथे गावकरी एकत्र येतात, जिथे भक्तीची नदी वाहते, जिथे महाराजांची कृपा प्रत्यक्ष अनुभवास येते — तेच हे श्रीक्षेत्र लाखोंडा. श्री क्षेत्र लाखोंडा हे केवळ भौगोलिक स्थान नसून महाराजांच्या दिव्य साक्षित्वाचे जिवंत केंद्र आहे. येथे येणारा प्रत्येक भक्त महाराजांच्या कृपादृष्टीचा अनुभव घेतो. लाखोंडाच्या या अखंड भक्तिदीपाने महाराजांचे चरित्र चिरंतन उजळून राहील, हे निःसंशय.

जय श्री परमहंस परशराम महाराज की जय!

आपला स्नेहांकित सेवाधारी




**जयंत सुरेशराव वानखडे**
९७६३७२९१३१


# एक प्रतिभावान हिंदुस्तानी शास्त्रीय संगीतकार, गायक

## पंडित जितेंद्र अभिषेकी यांची आज जयंती

पंडित जितेंद्र अभिषेकी हे संगीत रंगभूमीला पुनरुज्जीवन देणारे प्रतिभावान कलाकार होते. त्यांचे मूळ नाव गणेश बलवंत नवाथे असले तरी ते पं. जितेंद्र अभिषेकी या नावाचे प्रसिद्ध आहेत. त्यांचा जन्म २१ सप्टेंबर १९२९ रोजी मंगेशी (गोवा) येथे झाला. त्यांचे वडील बाळूबुवा (बलवंतराव) हे एक प्रख्यात कीर्तनकार व पंडित होते.

गोव्यातल्या मंगेशीच्या देवळात शंकराच्या पिंडीवर अभिषेक करणाऱ्या नवाथे यांच्या अभिषेकी घराण्यात जितेंद्र अभिषेकी यांचा जन्म झाला. कीर्तनकार असलेल्या वडिलांकडे संगीताचे प्राथमिक शिक्षण झाल्यावर पुढे त्यांनी पं. जगन्नाथबुवा पुरोहित यांच्याकडे संगीताचे रितसर धडे घ्यायला सुरुवात केली. संगीताच्या शिक्षणासाठी त्यांनी गोवा सोडले आणि ते पुण्याला आले. पुण्यात अनाथाश्रमात राहून, वारावर जेवून, माधुकरी मागून ते शिकले. त्यांनी एकूण २१ गुरू केले व प्रत्येक गुरूकडून नेमकं तेवढंच घेतलं. ते सारे संस्कार आत्मसात करून आपली स्वतंत्र गायनशैली निर्माण केली.



संगीताची आराधना करत असताना त्यांनी त्यांच्या शालेय अथवा महाविद्यालयीन शिक्षणाकडे दुर्लक्ष केले नाही. ते संस्कृतचे पदवीधर होते. त्यांचे वाचन अफाट होते. संस्कृतपासून ते उर्दू शेरोशायरीपर्यंतचे कितीतरी साहित्य त्यांना मुखोद्गत होते. सुस्पष्ट उच्चार, लयकारी व सरगम यांनी नटलेली ख्यालगायकी आणि विशेष कटाक्ष ठेवून मांडलेल्या बंदिशी हे त्यांच्या गायनाचं मर्म होतं. अभिषेकींनी मराठी रंगभूमीसाठी खूप मोठं योगदान दिलेले आहे. विद्याधर गोखल्यांच्या नंतरच्या काळात मराठी रंगभूमीला आलेली मरगळ दूर करून रंगभूमी पुन्हा टवटवीत झाली ती १९६४ साली आलेल्या वसंत कानेटकर लिखित आणि गोवा हिंदू असोसिएशन निर्मित संगीत 'मत्स्यगंधा' या नाटकामुळे. या नाटकातल्या पदांचं संगीत अभिषेकींचे होतं. त्यांनी एकूण १७ नाटकांना संगीत दिलं. गोवा कला अकादमीच्या जडणघडणीत त्यांचा सिंहाचा वाटा होता.

प्रयोगशीलता हा त्यांच्या संगीत दिग्दर्शनातला महत्त्वाचा गुणधर्म. त्यांनी त्यांच्या संगीतदिग्दर्शनात केलेले प्रयोग लोकांनाही खूप आवडले. उदा. मैलाचा दगड ठरलेल्या 'कट्यार काळजात घुसली' या नाटकाची सुरुवात त्यांनी भैरवीने केली होती. तर १९६६ साली रंगभूमीवर आलेल्या 'लेकुरे उदंड झाली' या नाटकात मुक्तछंदातल्या संवादांना आणि छंदाला प्राधान्य असलेल्या गोव्यातल्या किरिस्तावांच्या तियात्र या नाट्यप्रकारातल्या संगीताचा बाज त्यांनी वापरला. या नाटकात सगळ्यात पहिल्यांदा रेकॉर्डेड साऊंड ट्रॅक्स वापरले गेले. हे संगीत काळाच्या पुढे जाणारं होतं.

अभिषेकींनी जसं स्वत: संगीत दिलं तसं दुसऱ्यांच्या संगीत दिग्दर्शनातही ते गायले. आकाशवाणीसाठी केलेल्या बिल्हण या संगीतिकेत पु.लं.च्या संगीत दिग्दर्शनात ते गायले. यातली गीते मंगेश पाडगावकर यांनी लिहिलेली होती. तर 'वैशाख वणवा' या चित्रपटासाठी दत्ता डावजेकर यांनी संगीतबद्ध केलेले 'गोमू माहेरला जाते हो नाखवा' हे गीतही त्यांनी म्हणले. आकाशवाणीवर असताना त्यांनी अनेक कोकणी गाण्यांनाही संगीत दिलं. १९९५ सालच्या नाटयसंमेलनाचं अध्यक्षपदी त्यांची निवड झाली होती.

अभिषेकी यांनी त्यांच्या कारकिर्दीचा बराचसा काळ मुंबईत घालवला आणि नंतर ते पुण्यात स्थायिक झाले , जिथे त्यांनी अनेक शिष्यांना प्रशिक्षण दिले. मधुमेहाशी संबंधित दीर्घ आजारानंतर ७ नोव्हेंबर १९९८ रोजी पुण्यातील त्यांच्या निवासस्थानी त्यांचे निधन झाले, ज्यासाठी त्यांना पूर्वी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांच्या पश्चात त्यांची पत्नी, विद्या अभिषेकी, मुलगा शौनक अभिषेकी (शास्त्रीय गायक) आणि मुलगी, मेखला खाडिकर ( माहेरचे नाव अभिषेकी) आहेत. त्यांची पत्नी, विद्या अभिषेक, ज्यांच्याशी त्यांनी १९६९ मध्ये लग्न केले होते आणि ज्या त्यांच्या संगीत गुरुकुलचे व्यवस्थापनही करत होत्या, त्यांचे ५ एप्रिल २०२४ रोजी निधन झाले.

अभिषेकी यांना स्वातंत्र्योत्तर हिंदुस्तानी संगीतातील एक प्रभावशाली व्यक्तिमत्व मानले जाते आणि विशेषत: क्लिष्ट शास्त्रीय रचनांना नाट्य सादरीकरणासाठी सोपे करून, त्यांचा संगीतमय खोलपणा कायम ठेवत नाट्य संगीताला पुनरुज्जीवित करण्याचे श्रेय त्यांना दिले जाते. शुभा मुद्गल, देवकी पंडित, आशा खाडिलकर, महेश काळे आणि त्यांचे पुत्र शौनक अभिषेकी यांच्यासह अनेक प्रमुख गायकांनी त्यांच्याकडे प्रशिक्षण घेतले. २००४ पासून, त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी गोव्यात पंडित जितेंद्र अभिषेकी संगीत महोत्सव आयोजित केला जातो. हा महोत्सव २१ सप्टेंबर रोजी त्यांची जयंती साजरी करतो आणि यामध्ये देशभरातील नामवंत गायकांचे कार्यक्रम सादर होतात.

### सन्मान

नाट्यदर्पण, पद्मश्री, संगीत नाटक अकादमी, महाराष्ट्र गौरव पुरस्कार, गोमांतक मराठी अकादमी पुरस्कार, बालगंधर्व पुरस्कार, सुरश्री केसरबाई केरकर पुरस्कार, दिनानाथ स्मृति पुरस्कार, लता मंगेशकर पुरस्कार, नाट्यपरिषदेचा बालगंधर्व पुरस्कार, सरस्वती पुरस्कार(कैलास मठ नाशिक)

### शिकवण्याची पद्धत आणि विद्यार्थी

त्यांच्या संपूर्ण कारकिर्दीत त्यांनी गुरु-शिष्य परंपरेचा भाग म्हणून आणि विनामूल्य अनेक विद्यार्थ्यांना शिकवले, त्यापैकी बरेच जण स्वतःच्या अधिकारात प्रख्यात संगीतकार बनले. ते त्यांच्या विद्यार्थ्यांसोबत पहाटे ३:४५ च्या सुमारास खरज (खालच्या सप्तकात) मध्ये सकाळचा रियाज सुरू करत असत. अभिषेकींच्या शिकवण्याच्या पद्धतींमध्ये आवाजाचा विकास, आवाजाची श्रेणी वाढवणे आणि राग व बंदिशींचा पद्धतशीर सराव यावर लक्षणीय भर दिला गेला होता, ज्या पैलूंचे नंतर त्यांचे शिष्य मोहनकुमार दरेकर यांनी संगीतकारावरील एका चरित्रात्मक कामात दस्तऐवजीकरण केले. पुत्र शौनक अभिषेकी व्यतिरिक्त , अभिषेकी यांच्या सुप्रसिद्ध संगीत शिष्यांमध्ये आशा खाडिलकर, देवकी पंडित, शुभा मुदगल, मोहनकुमार दरेकर, जीवन धर्माधिकारी, हेमंत पेंडसे, अजित कडकडे, राजा काळे, प्रभाकर, सहकारी यांचा समावेश आहे. दुबले, डॉ. हृषिकेश मजुमदार आणि डॉ. माधुरी जोशी, पं. उज्जैनचे सुधाकर देवळे, महेश काळे.

सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
सोमवार, दि. २१ सप्टेंबर २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

## आयडियल पब्लिक स्कूलमध्ये 'रेड-डे'

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**आर्णी :** लहान वयातच रंगांची ओळख व्हावी आणि विद्यार्थ्यांमधील सर्जनशी लतेला वाव मिळावा, या उद्देशाने स्थानिक आयडियल पब्लिक स्कूलमध्ये 'रेड कलर डे' उत्साहात साजरा करण्यात आला. या निमित्ताने संपूर्ण शाळा परिसर लालमय झाला होता.

या कार्यक्रमासाठी चिमुकल्यांनी लाल रंगाचे आकर्षक कपडे परिधान केले होते. शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खेळ व गाण्यांच्या माध्यमातून लाल रंगा चे दैनंदिन जीवनातील महत्त्व, प्रतीकात्मक अर्थ समजावून सांगितला. विविध रंजक उपक्रमांमुळे लहानग्यांनी दिवसभर मोठा आनंद लुटला.

शाळेच्या मुख्याध्यापिका मुमताज बेग यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या उपक्रमासाठी शिक्षिका अर्शिया शेख, सानिया सैयद, रुखसार खान, शहेजीन शेख आणि आलिया शेख यांनी विशेष परिश्रम घेतले. या रंगतदार कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये कमालीचा उत्साह दिसून आला.

# पावसाच्या खंडाने पिके संकटात; शेतकऱ्यांना भरीव मदतीची ग्वाही

## कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडून पीक परिस्थितीचा आढावा : नुकसानग्रस्तांना न्याय देण्याचे आश्वासन

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**यवतमाळ :** पावसाने घेतलेल्या प्रदीर्घ विश्रांतीमुळे पश्चिम विदर्भातील खरीप पिकांवर संकट ओढवले असून, सोयाबीन, कापूस, तूर, मूग व उडिदाचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, नुकसानग्रस्तांना भरीव मदत करण्यात येईल, अशी ग्वाही कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी रविवारी दिली.

अकोला येथील डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठात अमरावती विभागातील पीक परिस्थितीचा आढावा घेण्यात आला.

यावेळी यवतमाळ जिल्ह्यातील पर्जन्यमान, पावसातील खंड, पिकांची स्थिती, पिण्याचे पाणी आणि चाऱ्याच्या उपलब्धतेवर चर्चा करण्यात आली. यवतमाळचे पालकमंत्री तथा कामगार मंत्री आकाश फुंडकर, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, आदिवासी विकास मंत्री अशोक उईके यांच्यासह लोकप्रतिनिधी व वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पश्चिम विदर्भात पावसाचे असमान वितरण आणि खंडामुळे पिकांना फटका बसला आहे. त्यामुळे सरकारी यंत्रणांनी शेतकऱ्यांच्या अडचणी संवेदनशीलतेने हाताळाव्यात, तसेच मुदतपूर्व पीक पाहणी व कापणीची प्रक्रिया वेळेत पूर्ण करावी, असे निर्देश भरणे यांनी दिले.

**ट्रान्सफॉर्मरच्या प्रश्नावर तातडीच्या उपाययोजना :** शेतातील सिंचनासाठी पाणी उपलब्ध असतानाही ट्रान्सफॉर्मरच्या अभावी वीजपुरवठा सुरळीत होत नसल्याची तक्रार लोकप्रतिनिधींनी केली.



यावर निरंतर योजनेतून नवीन ट्रान्सफॉर्मर उपलब्ध करून देण्याबरोबरच नादुरुस्त ट्रान्सफॉर्मर तातडीने दुरुस्त करण्याचे निर्देश देण्यात आले. धोकादायक व उघड्या अवस्थेतील विद्युत रोहित्रांबाबतही त्वरित उपाययोजना करण्याच्या सूचना कृषिमंत्र्यांनी दिल्या.

### कर्जमुक्ती योजनेचा उल्लेख

- शेतकऱ्यांना कर्जाच्या ओझ्यातून दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना राबविली आहे. दोन लाख रुपयांपेक्षा अधिक थकीत कर्ज असलेल्या शेतकऱ्यांना ५० हजार रुपयांचा प्रोत्साहन निधी देण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली.

### दुष्काळाच्या बनावट यादीवर कारवाईचा इशारा

- दरम्यान, दुष्काळग्रस्त तालुक्यांची बनावट यादी समाजमाध्यमांवर प्रसारित होत असल्याचा मुद्दाही बैठकीत उपस्थित झाला. शासनाने अद्याप अशी कोणतीही यादी जाहीर केलेली नसल्याचे कृषिमंत्री भरणे यांनी स्पष्ट केले. शेतकऱ्यांच्या भावनांशी खेळणाऱ्या अशा खोडसाळ प्रकारांविरुद्ध कठोर कारवाई केली जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. नुकसानग्रस्त प्रत्येक शेतकऱ्याला न्याय मिळवून देण्यासाठी शासन आवश्यक ती मदत करेल, असे भरणे यांनी स्पष्ट केले.

## घरफोडीचा छडा; मुद्देमालासह आरोपी ताब्यात

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**घाटंजी :** बंद घराचे कुलूप व साखळी तोडून सोन्याचे दागिने व रोख रक्कम लंपास करणाऱ्या आरोपीला पारवा पोलिसांनी अवघ्या २४ तासांत ताब्यात घेतले.

आकाश विठ्ठल चव्हाण (२७, रा. केळापूर तांडा, ता. घाटंजी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. त्याच्याकडून ४५ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने हस्तगत करण्यात आले.

केळापूर तांडा येथील शेतकरी दशरथ रामजी जाधव (६०) हे १७ सप्टेंबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ३ वाजेच्या दरम्यान घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. याच संधीचा फायदा घेत चोरट्याने घराच्या दरवाजाचे कुलूप व साखळी तोडून घरात प्रवेश केला. त्यानंतर लोखंडी पेटीचे झाकण वाकवून त्यातील सोन्याची पोत (३० हजार रुपये), सहा सोन्याच्या पात्या (१५ हजार रुपये), १० हजार रुपये रोख असा एकूण ५५ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला.

याप्रकरणी दशरथ जाधव यांच्या तक्रारीवरून पारवा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल होताच पोलिस निरीक्षक हेमंत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली तपासाला वेग देण्यात आला. पोलिसांनी आकाश चव्हाण याला ताब्यात घेतल्यानंतर चौकशीत त्याने घरफोडीची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले. त्यानंतर १८ सप्टेंबर रोजी त्याला रीतसर अटक करण्यात आली.



पारवा पोलिसांची कारवाई

त्याच्या ताब्यातून ५६ गव्हाचे मणी व लॉकेट असलेली ३० हजार रुपये किमतीची सोन्याची पोत आणि १५ हजार रुपये किमतीच्या सहा सोन्याच्या पात्या असा एकूण ४५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई पोलिस अधीक्षक, अपर पोलिस अधीक्षक, उपविभागीय पोलिस अधिकारी आणि ठाणेदार हेमंत चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपनिरीक्षक गोपाल राठोड, पोलिस हवालदार श्याम मेश्राम, पोलिस अंमलदार भानूदास हेपट यांच्या पथकाने केली.

## खंडित होणाऱ्या वीज पुरवठ्याचा वैताग

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**यवतमाळ :** हवा, वीज, पाणी काहीही नसताना रात्रीदरम्यान वीज पुरवठा खंडित होण्याचे प्रमाण वाढले आहे. उकाड्यामुळे मच्छरांचा उपद्रवदेखील वाढला आहे.



यामुळे वीज पुरवठा खंडित झाल्यास रात्रीला नागरिकांना त्रास सहन करावा लागतो. बत्ती गुल झाल्यास उशिरापर्यंत येत नाही. याचा सर्वाधिक त्रास लहान मुलांसह ज्येष्ठ नागरिकांना सहन करावा लागत आहे. त्याचा परिणाम आरोग्यावरदेखील होत आहे. वीज वितरणने वीज पुरवठ्याच्या समस्येकडे लक्ष द्यावे, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

## घरफोडीचे दोन गुन्हे उघड; १.१८ लाखांचा मुद्देमाल जप्त



प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**यवतमाळ :** शहरातील घरफोडीच्या दोन गुन्ह्यांचा छडा लावत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडून सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम, लॅपटॉप असा एकूण १ लाख १८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही कारवाई रविवारी दि. २० सप्टेंबर रोजी करण्यात आली.

यवतमाळ शहरातील वाढत्या घरफोडी व जबरी चोरीच्या पार्श्वभूमीवर गुन्हे उघडकीस आणण्याच्या सूचना पोलिस अधीक्षक कुमार चिंता यांनी स्थानिक गुन्हे शाखेला दिल्या होत्या. त्यानुसार पथक गस्तीवर असताना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे दोन विधीसंघर्षग्रस्त बालकांना ताब्यात घेण्यात आले.

पंचांसमक्ष केलेल्या अंगझडतीत एका बालकाकडून सोन्या-चांदीचे दागिने आणि आठ हजार रुपये रोख असा १९ हजार रुपयांचा मुद्देमाल मिळून आला. दुसऱ्या बालकाकडील बॅगेत लिनोव्हा कंपनीचा लॅपटॉप, चार्जर आणि ४९ हजार ६०० रुपये रोख असा ९९ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. चौकशीत हा मुद्देमाल अवधूतवाडी पोलिस ठाणे आणि यवतमाळ शहर पोलिस ठाण्यात दाखल असलेल्या प्रत्येकी एका घरफोडीच्या गुन्ह्यातील असल्याचे निष्पन्न झाले. त्यामुळे दोन्ही गुन्ह्यांचा छडा लागला असून एकूण १ लाख १८ हजार ६०० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. ही कारवाई पोलिस अधीक्षक कुमार चिंता, अपर पोलिस अधीक्षक अशोक थोरात आणि स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक सतीश चवरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक मनीष गावंडे, गजानन राजमल्लू, पोलिस उपनिरीक्षक सागर इंगळे तसेच अजय डोळे, प्रशांत हेडाऊ, रूपेश पाली, योगेश डगवार, निलेश राठोड, सुनील पैठणे, आकाश सूर्यवंशी, देवेंद्र होले आणि प्रतीक नेवरे यांच्या पथकाने केली.

## शिवसेना उपजिल्हा संघटकपदाची संभाजी गोरटकर



प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**उमरखेड :** घराणेशाही, पैशाच्या राजकारणात निष्ठेला वाव असतो, हे शिवसेनेने पुन्हा सिद्ध केले आहे. ढाणकी येथील सामान्य कुटुंबातील कार्यकर्ते संभाजी गोरटकर यांची शिवसेना उपजिल्हा संघटकपदी नियुक्ती करण्यात आली आहे. पक्षप्रमुख उद्धव ठाकरे व आदित्य ठाकरे यांच्या आदेशाने ही जबाबदारी सोपवण्यात आली. कोणतीही राजकीय पार्श्वभूमी नसताना गोरटकर यांनी युवासेना शहर प्रमुख ते तालुका प्रमुख असा संघर्षमय प्रवास केला. रात्र-दिवस कष्ट करून त्यांनी तळागाळात शिवसेना पोहोचवली. वंदनीय बाळासाहेबांच्या ८०% समाजकारण व २०% राजकारणाच्या विचारांवर निष्ठा ठेवणाऱ्या या कार्यकर्त्याच्या निवडीमुळे सर्वसामान्य शिवसैनिकांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले आहे.

## पीक विम्यासह दुष्काळी मदत तातडीने द्या

### आ. वानखेडे यांची कृषिमंत्री भरणे यांच्याकडे मागणी

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**उमरखेड :** उमरखेड - महागाव विधानसभा मतदारसंघातील शेतकऱ्यांना पीक विम्याचा लाभ तसेच दुष्काळी मदत तातडीने देण्यात यावी, अशी मागणी आमदार किसन वानखेडे यांनी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्याकडे केली. अकोला येथे रविवारी झालेल्या अमरावती विभागातील पीक परिस्थितीच्या आढावा बैठकीत त्यांनी मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या गंभीर प्रश्नांकडे शासनाचे लक्ष वेधले.

अपुरा पाऊस आणि पावसातील प्रदीर्घ खंडामुळे उमरखेड-महागाव मतदारसंघातील खरीप पिकांची स्थिती चिंताजनक झाली आहे. विशेषतः माळरानावरील शेती तसेच बंदी भागातील पिकांना पाण्याअभावी मोठा फटका बसला आहे.

अनेक ठिकाणी उभी पिके कोमेजून करपण्यास सुरुवात झाली असून शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे.



- प्रधानमंत्री पीक विमा योजनेत शेतकरी लाभापासून वंचित राहू नयेत, यासाठी केवळ उपग्रह पाहणी ग्राह्य न धरता महसूल व कृषी विभागाच्या प्रत्यक्ष पाहणी अहवालाचा विचार करावा, अशी मागणी वानखेडे यांनी केली. मतदारसंघाची तातडीने प्रत्यक्ष पाहणी करून कोरडा दुष्काळ जाहीर करावा आणि नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत, पीक नुकसानभरपाई व विम्याचा लाभ द्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

बैठकीस आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, कामगार मंत्री आकाश फुंडकर, मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, राज्यमंत्री मेघना बोर्डीकर, खासदार अनुप धोत्रे, आमदार चैनसुख संचेती, प्रकाश भारसाकळे, रणधीर सावरकर, राजू तोडसाम, प्रवीण तायडे, राजेश वानखडे, हरीश पिंपळे, श्वेताताई महाले, कृषी सचिव परिमल सिंह यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## अखेर डोंगरखर्डा आदर्श विद्यालयाला तीन शिक्षक

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**कळंब :** कळंब तालुक्यातील डोंगरखर्डा येथील आदर्श विद्यालयातील शिक्षकांची कमतरता अखेर काही प्रमाणात दूर झाली आहे. नव्याने तीन शिक्षक रुजू झाल्याने विद्यार्थी, पालक आणि नागरिकांना दिलासा मिळाला आहे. मात्र, ३८३ विद्यार्थ्यांची पटसंख्या लक्षात घेता अद्यापही आणखी दोन शिक्षकांची आवश्यकता असल्याचे शाळा प्रशासनाने सांगितले.

सन २०१६ पासून शाळेतील शिक्षक एकापाठोपाठ एक निवृत्त होत गेल्याने शिक्षकांची संख्या कमी झाली. त्याचा परिणाम विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर होत असल्याची पालकांची तक्रार होती. शिक्षकांची आवश्यकता लक्षात घेऊन शाळेने पवित्र पोर्टलवर मागणी नोंदविली होती.

सन २०२५ च्या प्रक्रियेत शाळेने सहा शिक्षकांची मागणी केली होती. त्यानुसार सुरुवातीला चार शिक्षक रुजू झाले. मात्र, त्यापैकी एका शिक्षकाने रुजू झाल्यानंतर अवघ्या आठवडाभरात राजीनामा दिल्याने पुन्हा शिक्षकांची संख्या कमी झाली.

३८३ विद्यार्थ्यांसाठी मुख्याध्यापकांसह १० शिक्षक

आता तीन नवीन शिक्षक रुजू झाल्याने मुख्याध्यापकांसह एकूण १० शिक्षक कार्यरत आहेत. त्यामुळे अध्यापन व्यवस्था सुरळीत होण्यास मदत होणार आहे. तरीही विद्यार्थ्यांची संख्या विचारात घेता आणखी दोन शिक्षकांची गरज आहे. उर्वरित पदे पवित्र पोर्टल २०२६ अंतर्गत पुढील प्रक्रियेत भरण्यात येणार असल्याने पालकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत.

## हिंगोली मतदारसंघात कोरडा दुष्काळ जाहीर करा

### खा. आष्टीकर आक्रमक, कृषीमंत्र्यांकडे थेट मागणी

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**उमरखेड :** हिंगोली लोकसभा मतदारसंघातील नांदेड, हिंगोली आणि यवतमाळ जिल्ह्यांतील बहुतांश भागात पावसाने तब्बल महिनाभरापासून दडी मारल्यामुळे खरीप हंगाम पूर्णपणे वाया गेला आहे. हाताशी आलेले पीक करपून गेल्याने शेतकरी प्रचंड मोठ्या संकटात सापडला आहे.

या गंभीर परिस्थितीची दखल घेत हिंगोलीचे खासदार नागेश पाटील आष्टीकर यांनी थेट राज्याचे कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांची भेट घेऊन निवेदन सादर केले व संपूर्ण मतदारसंघात तात्काळ 'कोरडा दुष्काळ' जाहीर करण्याची ठाम मागणी केली.



दिर्घकालीन पावसाच्या खंडामुळे खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.

त्यामुळे मतदारसंघातील सर्व तालुक्यांमध्ये अधिकृतपणे कोरडा दुष्काळ घोषित करावा.

शासकीय मदत व सवलती: आर्थिक अडचणीत सापडलेल्या बळीराजाला सावरण्यासाठी तातडीने विशेष शासकीय आर्थिक मदत, पीक विमा भरपाई आणि महसुली सवलती लागू कराव्यात.

**मराठवाडा व विदर्भाला दिलासा :** हिंगोली लोकसभेत येणाऱ्या मराठवाडा (हिंगोली, नांदेड) आणि विदर्भ (यवतमाळ) या दोन्ही विभागांतील बाधित शेतकऱ्यांना तातडीने मदत पोहोचवावी.

### शेतकऱ्यांमधून समाधान

- शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांची उत्तम जाण असलेले खासदार आष्टीकर यांनी ऐन संकटाच्या वेळी पुढाकार घेत थेट कृषीमंत्र्यांकडे धाव घेतल्याने मतदारसंघातील शेतकऱ्यांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. नैसर्गिक संकटाच्या काळात लोकप्रतिनिधी म्हणून दाखवलेल्या या तत्परतेबद्दल हिंगोली लोकसभा मतदारसंघातील बळीराजाने समाधान व्यक्त केले आहे.



## नगर परिषद कार्यालय, घाटंजी जि. यवतमाळ

### शुद्धीपत्रक

नगर परिषद घाटंजीच्या मालकीच्या गाळ्यांच्या ई-लिलावाबाबत दि. २६/०८/२०२६ रोजी सिटी न्यूज या वर्तमानपत्रामध्ये तसेच ई-लिलाव पोर्टलवर जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर ई-लिलावाच्या जाहिरातीमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर व्यापारी संकुल ब्लॉक 11 मधील गाळा क्र. २१ दिव्यांग करिता तसेच गाळा क्र. २४ भटक्या जमाती प्रवर्गासाठी (NT) करिता आरक्षित असलेले गाळे तांत्रिक अडचणीमुळे दिनांक दि. २५/०८/२०२६ रोजी नियोजित करण्यात आलेला गाळा क्र. २१ व गाळा क्र. २४ चा ई-लिलाव रद्द करण्यात येत आहे. तसेच सुधारित ई-लिलावाची जाहिरात विवरण खालीलप्रमाणे.

| गाळा क्र. | गाळा प्रकार | गाळ्याचे क्षेत्रफळ चौ.मी. | गाळे निविदा फी रक्कम रु. | गाळे बोली अनामत रक्कम रु. | त्रिसदस्यीय समितीने निश्चित केलेले प्रतिमाह भाडे बोली रक्कम रु. | स्थायी निर्देश २४ नुसार १०% कमी करून निश्चित झालेली भाडे बोली रक्कम रु | बोलीची पट रक्कम रु. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| गाळा क्र. २१ | दिव्यांग (आरक्षित) | ९.४८५ | ५०० | २५,००० | ४१०७/- | ३६३६ | १०० |
| गाळा क्र. २४ | भटक्या जमाती (आरक्षित) | ९.४८५ | ५०० | २५,००० | ४१०७/- | ३६३६ | १०० |

### ई-लिलाव प्रक्रियेचा तपशील (ब्लॉक H)

| अ. क्र. | तपशील | पासून | पर्यंत |
|---|---|---|---|
| १ | इ-लिलावात सहभागी होणेसाठी पात्रता मिळवणे | दि. २१/०९/२०२६ स.११.00 | दि.२८/०९/२०२६ सायं. ५.00 पर्यंत |
| २ | ई लिलावात पात्रता ठरविण्यासाठी कार्यालयीन कालावधी | दि.२९/०९/२०२६ स.१0.00 पासून | दि. ३0/०९/२०२६सायं. ५.00 पर्यंत |
| ३ | ई लिलावात पात्र झालेनंतर प्रत्यक्ष ई लिलावात बोली बोलणेचा कालावधी खालीलप्रमाणे | दि.0१/१0/२०२६ स.१0.00 ते सायं. ५.00 पर्यंत | |

**टीप :-** सदर ई लिलाव प्रक्रियेबाबत लिलावधारकांच्या शंका/अडचणी असल्यास कार्यालयीन वेळेत (सोमवार ते शुक्रवार स.१0.00 ते सायं.0६.00) कर विभाग, न.प. घाटंजी यांचेशी संपर्क साधावा, तरी सर्व लिलाव धारकांनी याची नोंद घ्यावी.

**स्वा./-**
**(परेश शांतीलाल कारिया)**
**नगराध्यक्ष न.प. घाटंजी**

**स्वा./-**
**(सोनल अंकुश ठाकरे)**
**उपनगराध्यक्ष न.प. घाटंजी**

**स्वा./-**
**(राजु एम. घोडके)**
**मुख्याधिकारी न.प. घाटंजी**

# सातबाऱ्यावर खाडाखोड करून घेतला शासकीय योजनेचा लाभ!

## एकाच सात-बाऱ्यावर दाखविले वेगवेगळे पेरे; बाजार समिती उपसभापती विरोधात तक्रार

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**अचलपूर :** येथे एकाच सातबारावर एकाच वर्षात वेगवेगळे पेरे दाखवून शासकीय योजनेचा लाभ घेतला असल्याची तक्रार बाजारसमितीचे उपसभापती अतुल वाट यांच्याविरोधात करण्यात आली आहे. सदर सातबाराचा वापर बाजार समितीअंतर्गत शासकीय हमीभाव खरेदी केंद्रावर ऑनलाईन नोंदणीसाठी केला आणि कपाशी आणि तूर शासनाला विकून आर्थिक लाभ घेतल्याने प्रथमत: सदर तक्रार बाजारसमिती कार्यालयात करण्यात आली आहे. तक्रारीच्या प्रतिलिपी वरिष्ठांना सादर केल्या आहे.

तक्रारीनुसार, कामतवाडा गट नंबर १८/२ मध्ये वाट यांची १.२९ हेक्टर आर शेती असून सदर क्षेत्रफळाचा सातबारा त्यांचे नावे ऑनलाईन आहे. उल्लेखनीय म्हणजे त्यांच्या ओरिजनल पेरेपत्रकावर २०२०-२१ पर्यंत कापूस पेरा नमूद आहे. मात्र त्यानंतरच्या प्रत्येक वर्षी २०२५-२६ पर्यंत या ओरिजनल सातबारावर पेरा नमूद नाही. मात्र वाट यांनी ऑनलाईन नोंदणीसाठी सादर केलेल्या याच ओरिजनल डिजिटल सातबारावर खोडतोड करून २०२५-२६ मध्ये सातबाराच्या १.२९ हेक्टर आर क्षेत्रफळावर खरीप पीक म्हणून कापूस तर रब्बी पीक म्हणून हरभरा या पिकांची बोगस नोंद केली आहे. या बोगस सातबाराचा वापर शासकीय हमीभाव धान्य खरेदी अंतर्गत अचलपूर बाजार समितीमध्ये सीसीआयला कापूस विकण्यासाठी केला गेला आणि शासकीय हमीभावावर शासनाला तूरसुद्धा विकल्या गेली. उल्लेखनीय म्हणजे त्यांनी एकाच तारखेला एकापेक्षा जास्त डिजिटल सातबारा पोर्टलवरून काढले आणि तेही काही मिनिटांच्या फरकाने, हे येथे उल्लेखनीय आणि काही मिनिटातच परिपत्रकावरील धान्याचे पेरे बदलले गेले.

### पात्र शेतकरी शासकीय लाभांपासून दूर

कपाशी, सोयाबीन, तूर या धान्यासाठी शासनाकडून हमीभाव देऊन खरेदी केली जाते. खाजगी व्यापाऱ्यांच्या तुलनेत धान्याचा शासकीय भाव दोन ते तीन हजार रुपयाने जास्त असल्यामुळे शेतकऱ्यांचा कल शासनाला विकण्याचा असतोः मात्र त्यासाठी प्रमुख अट ही असते की, सातबारा पेरे पत्रकावर सदर पिकाची नोंद असावी लागते. त्यामुळे लालचेपोटी शेतकरी अशा प्रकारच्या चुका करतात आणि त्यामुळे मात्र खरे शेतकरी शासकीय लाभापासून वंचित राहतात.




सातबारावर डिजिटल खोडतोड करून बाजार समितीच्या शासकीय हमीभाव केंद्रावर ऑनलाईन नोंदणी करून शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी तक्रार दाखल आहे. त्या अनुषंगाने सोमवार २१ सप्टेंबर रोजी सदर तक्रार सभापती यांच्या टेबलवर माहितीसाठी ठेवली जाणार आहे. त्यानंतर पुढील कारवाईसाठी संचालकांच्या मीटिंगमध्ये हा विषय मांडला जाईल.

**मंगेश भेटाळू,**
सचिव (प्रभारी) बाजारसमिती, अचलपूर

# आ. प्रविण पोटे यांच्या कार्यालयात रवींद्र चव्हाण यांचा वाढदिवस साजरा

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

### भाजपा खासदार, आमदारांसह पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती



**अमरावती :** भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या वाढदिवसानिमित्त आ. प्रविण पोटे पाटील यांच्या जनसंपर्क कार्यालयात वाढदिवस केक कापून व विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी भाजप नेते तथा खासदार डॉ. अनिल बोंडे, भाजप जिल्हाध्यक्ष आमदार प्रतापदादा अडसड, आमदार राजेश वानखडे, आमदार प्रवीण तायडे, आमदार उमेश यावलकर, आमदार केवलराम काळे, माजी प्रदेश सचिव जयंत डेहणकर, प्रदेश प्रवक्ते शिवराय कुळकर्णी यांच्यासह प्रभूदासजी भिलावेकर, तुषार भारतीय, नितीन गुडधे पाटील, चेतन पवार, राजेश पड्डा साहू, प्रदीप गौरखेडे, बलदेव बजाज तसेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मा. रवींद्रजी चव्हाण यांनी पक्ष संघटनेतील विविध जबाबदाऱ्या सांभाळताना संघटनात्मक बांधणी, कार्यकर्त्यांशी सातत्यपूर्ण संवाद आणि पक्षाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभागाला महत्त्व दिले आहे. प्रदेशाध्यक्ष म्हणूनही ते संघटनेच्या विविध स्तरांवरील पदाधिकारी व कार्यकर्त्यांशी संवाद साधत असून, पक्ष संघटना अधिक सक्षम व प्रभावी करण्यासाठी संघटनात्मक समन्वय आणि कार्यकर्त्यांच्या सहभागावर नेहमी भर देत असून त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात भाजपा मजबूत झाल्याची यावेळी उपस्थित मान्यवरांनी नमूद केले. वाढदिवसानिमित्त झालेल्या या कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी रवींद्रजी चव्हाण यांच्या पुढील संघटनात्मक वाटचालीसाठी सदिच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमामुळे जनसंपर्क कार्यालयात उत्साहाचे वातावरण होते.



अमरावती कृषी विभागाच्या बैठकीत अमरावती जिल्ह्यात सरसकट कोरडा दुष्काळ जाहीर करावा अशी कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या कडे खासदार बळवंत वानखडे ( अमरावती लोकसभा ) यांनी मागणी केली.



राजापेठ स्पोर्टिंग क्लब. वैष्णवी देवी मंदिर गुफा देखावा.

# माणुसकी जपणारा नेता गजानन पाटील वाकोडे

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**दर्यापूर :** राजकारणात पद मोठं असणं ही एक गोष्ट आहे; पण त्या पदासोबत सामान्य माणसांशी जोडलेपण, आपुलकी आणि माणुसकी जपणं ही त्याहून मोठी गोष्ट आहे. याचं एक सुंदर उदाहरण नुकतंच दर्यापूर-बाभळी येथील टाटा नगर परिसरात पाहायला मिळालं.



शिवसेना शिंदे गटाचे अमरावती जिल्हा सहसंपर्क प्रमुख गजानन पाटील वाकोडे हे आपल्या निवासस्थान असलेल्या दर्यापूर-बाभळी गावातील टाटा नगर परिसरात गणपती बाप्पाच्या आरतीसाठी गेले होते.

विशेष म्हणजे, या गणपतीची स्थापना कोणत्याही मोठ्या मंडळाने केली नव्हती. वय वर्षे 15, 10, 18 अशा लहान मुलांनी एकत्र येऊन आपल्या परीने गणपती बाप्पाची स्थापना केली होती. ना मोठा रस्ता, ना आकर्षक डेकोरेशन, ना मोठी रोषणाई... अगदी साध्या पद्धतीने, आपल्या श्रद्धेने आणि भक्तीने त्या मुलांनी बाप्पाला विराजमान केलं होतं. त्या मुलांनी गजानन पाटील वाकोडे यांना आरतीसाठी येण्याची विनंती केली.

सामान्यतः मोठ्या कार्यक्रमांना, मोठ्या मंडपांना आणि मोठ्या गर्दीला महत्त्व दिलं जातं. पण इथे गजानन पाटील वाकोडे यांनी कुठलाही विचार न करता, त्या मुलांच्या आग्रहाला मान देत थेट आरतीसाठी जाणं पसंत केलं. त्यांनी तिथे मोठेपणा दाखवला नाही, कोणतीही अपेक्षा ठेवली नाही. कारण त्यांच्या दृष्टीने तो मोठा मंडप नव्हता, मोठी गर्दी नव्हती किंवा मोठं आयोजन नव्हतं— तिथे होती ती फक्त काही छोट्या मुलांची श्रद्धा आणि गणपती बाप्पावरील भक्ती.

गरीब आणि सर्वसामान्य कुटुंबातील त्या मुलांनी आपल्या परीने गणपती बसवला आणि आपल्या आरतीला येण्यासाठी एका मोठ्या व्यक्तीला आग्रह केला. त्या मुलांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि त्यांच्या आग्रहाला दिलेला मान हीच या प्रसंगाची खरी सुंदरता आहे.पद कितीही मोठं असलं तरी माणूस मोठा होतो तो आपल्या वागण्यातून.गजानन पाटील वाकोडे यांनी त्या दिवशी दाखवून दिलं की, समाजातील प्रत्येक घटक महत्त्वाचा आहे. एखाद्या मोठ्या कार्यक्रमात जाणं सोपं असतं; पण छोट्या मुलांनी प्रेमाने बोलावलं म्हणून त्यांच्या छोट्याशा गणपती मंडपात जाऊन त्यांच्या आनंदात सहभागी होणं, ही गोष्ट मनाला भिडणारी आहे.

# विदर्भात काही ठिकाणी पावसाची शक्यता; हवामान तज्ञ प्रा. अनिल बंड यांचा अंदाज



प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**अमरावती :** बंगालच्या उपसागरात चक्रीवादळाची शक्यता प्रा. अनिल बंड अंदमान समुद्रात निर्माण झालेले कमी दाबाचे क्षेत्र पश्चिम - उत्तर दिशेने उत्तर मध्य बंगालच्या उपसागरात पोहोचले आहे. आणि त्याची तीव्रता वाढत आहे. आज त्यांचे रूपांतर डीप डीप्रेशन (DD) होईल आणि ते २३/२४तारखेला आंध्र ओरिसा किनारपट्टीला पार कर शकते. त्यावेळी कदाचित त्याचे रूपांतर चक्रीवादळात होऊ शकते. असा अंदाज हवामान तज्ञ प्राध्यापक अनिल बंड यांनी व्यक्त केला आहे. २१,२२सप्टेबर रोजी विदर्भात काही ठिकाणी हलक्या मध्यम पावसाची शक्यता. वातावरण अंशतः ढगाळ राहील. २३ ते २७ सप्टेंबर विदर्भात बहुतांश ठिकाणी हलक्या मध्यम पावसाची शक्यता असून तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस आहे. वातावरण वेगाने बदलत असल्याने हवामान अंदाजाची अपडेट दररोज घ्यावे असे आवाहन प्रा. अनिल म बंड अमरावती यांनी केले आहे.

## चिंचोली शेतशिवारात शेतकऱ्याची आत्महत्या

**धामणगांव रेल्वे :** तालुक्यातील चिंचोली शेतशिवारात सततच्या नापिकीला कंटाळून शेतकऱ्याची गळफास घेऊन आत्महत्या केली. मृतकाचे नाव सुरेश देवराव अमझरे (४०) रा. चिंचोली असे आहे.

सुरेश अमझरे यांचे वडिलांच्या नावे संयुक्त कुटुंबात २ एकर शेती असून ते मागील काही दिवसांपासून सततच्या नापिकीमुळे आर्थिक अडचणीत आले होते. कुटूंबांच्या उदरनिर्वाहसाठी त्यांनी कल्पतरु महिला बचतगटाकडून २५ हजार रूपयाचे कर्ज घेतले होते. त्यातच त्यांच्या आईला पॅरालिसीसचा आजार असल्याने सतत दवाखान्याचा खर्च वाढत होता, या सर्व कारणांमुळे ते प्रचंड तणावात होते. शनिवारी दुपारच्या सुमारास त्यांनी हे टोकाचे पाऊल उचलले. त्यांच्या पश्चात पत्नी रूपाली, मुलगी वैष्णवी, मुलगा गौरव व आई-वडील असा आप्त परिवार आहे.

# पोटे अभियांत्रिकी येथे परदेशातील उच्च शिक्षणाच्या संधींबाबत मार्गदर्शनपर व्याख्यान

## आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स विभागाचा उपक्रम

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**अमरावती :** पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड मॅनेजमेंट, अमरावती येथील आर्टिफिशियल इंटेलिजन्स अँड डेटा सायन्स (AI&DS) आणि FAID (Forum of AI Developer) यांच्या वतीने "Global Opportunities for Higher Studies Abroad" या विषयावर विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.




या कार्यक्रमात प्राजक्ता पी. काळे, संचालक, Proficient Test Prep and Abroad Solutions आणि श्री. अश्विन अलसी यांनी विद्यार्थ्यांना परदेशातील उच्च शिक्षणाच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. प्रवेश प्रक्रिया, आवश्यक पात्रता, भाषा परीक्षा, व्हिसा प्रक्रिया, शिष्यवृत्ती तसेच विविध देशांमधील उच्च शिक्षणाच्या संधी याबाबत विद्यार्थ्यांना सविस्तर माहिती देण्यात आली. प्राजक्ता पी. काळे यांनी Northern Illinois University येथून M.S. in Management Information Systems चे शिक्षण घेतले असून त्या IIM Bangalore च्या Executive Education कार्यक्रमाच्या माजी विद्यार्थिनी आहेत. त्यांनी अमेरिकेतील Deloitte आणि Hewlett Packard यांसारख्या नामांकित कंपन्यांमध्ये Business Analyst म्हणून काम केले आहे. परदेशी शिक्षण क्षेत्रात त्यांना ८ वर्षांचा अनुभव असून त्यांनी १०० हून अधिक मार्गदर्शनपर सेमिनार घेतले आहेत. कार्यक्रमास AI & DS विभागाचे विभागप्रमुख डॉ. अजय बी. गाडिचा यांचे मार्गदर्शन लाभले. कार्यक्रमाचे समन्वयक म्हणून प्रा. मीनल पारडे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली असून प्रा. मेघा चिंचमालातपुरे यांनी सहकार्य केले . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. श्रावणी गिरी आणि कु. सौम्या पांडे यांनी प्रभावीपणे केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी FAID फोरमच्या सर्व सदस्यांनी सक्रिय सहभाग घेतला. या व्याख्यानामुळे विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षणाच्या उपलब्ध संधी, प्रवेश प्रक्रिया आणि भविष्यातील करिअरसाठी आवश्यक तयारी उपयुक्त व प्रेरणादायी माहिती मिळाली.

# 77 वर्षांनंतर सिंधी समाजाला दिलासा



प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**अमरावती :** फाळणीनंतर १९४७ मध्ये सिंधमधून निर्वासित म्हणून आलेल्या सिंधी समाजाला ७७ वर्षांनंतर मालकी हक्क मिळाला आहे.

तात्पुरत्या छावण्यांमध्ये वास्तव्य करणाऱ्या समाजाचा हा प्रश्न अनेक दशके प्रलंबित होता. नागपूरचे नगरसेवक वीरेंद्र कुकरेजा यांच्या पाठपुराव्यामुळे २०२५ मध्ये मालकी हक्क देण्याचा प्रस्ताव मंजूर झाला.

या निर्णयामुळे अमरावतीसह राज्यभरातील सिंधी बांधवांना मोठा दिलासा मिळाला असून, हा केवळ जमिनीचा हक्क नसून फाळणीची वेदना सोसलेल्या समाजाला मिळालेला न्याय असल्याची भावना महापौर श्रीचंद तेजवाणी यांनी व्यक्त केली.

या निर्णयासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आभार मानण्यात आले.

पत्रकार परिषदेला नितीन धांडे शिवराय कुलकर्णी महापौर प्रवीण पोटे जयंत डेहनकर आदी उपस्थित होते.

# महावितरणच्या अमरावती परिमंडळात जनजागृती व प्रबोधन

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**अमरावती :** गणेशोत्सव हा 'राज्य महोत्सव' म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात उत्साहात साजरा होत असतानाच, महावितरणच्या अमरावती परिमंडळाने अनोख्या जनजागृती उपक्रमाचे आयोजन केले. १५ सप्टेंबर रोजी 'राष्ट्रीय अभियंता दिना'चे औचित्य साधून परिमंडळातील महावितरणच्या अभियंत्यांनी एकाच दिवशी परिमंडळातील १७९ शाळा / महाविद्यालयात जावून २७ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना विद्युत सुरक्षा आणि ऊर्जा बचतीतीबाबत मार्गदर्शन केले.



महाराष्ट्र शासनाच्या निर्देशानुसार गणेशोत्सव राज्य महोत्सव म्हणून साजरा करण्यात येत आहे. महावितरणतर्फे 'हरित ऊर्जा आणि विद्युत सुरक्षेच्या माध्यमातून ऊर्जा स्वातंत्र्याकडे वाटचाल' या संकल्पनेवर आधारित हा उपक्रम राबवण्यात येत आहे. मुख्य कार्यालयाचे निर्देश आणि मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या मार्गदर्शनाखाली अमरावती जिल्ह्यातील ८७ आणि यवतमाळ जिल्ह्यातील ८९ अशा एकूण १७६ शाळा व महाविद्यालयांमध्ये हा थेट संवाद कार्यक्रम पार पडला. यात एकूण २७ हजार ६३६ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला.

या उपक्रमादरम्यान महावितरणच्या अधिकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना वीज अपघातांची कारणे, दरवर्षी होणाऱ्या दुर्घटना आणि त्यामुळे संबंधित कुटुंबांवर ओढवणारे आर्थिक व सामाजिक संकट याविषयी सविस्तर माहिती दिली. ओल्या हाताने विजेच्या उपकरणांना स्पर्श करणे, चालू कुलरमध्ये पाणी भरणे, तुटलेल्या वीज वाहिन्यांना हात लावणे, आकडे टाकून अनधिकृत वीज वापरणे तसेच कपडे वाळत घालण्यासाठी वीज खांबांना तारा बांधणे, अशा अनावधानाने घडणाऱ्या चुकांमुळे होणाऱ्या अपघातांची विविध उदाहरणे देत विद्यार्थ्यांना सतर्कतेचे उपाय समजावून सांगण्यात आले. सोबतच ही माहिती पालकांपर्यंत आणि समाजात पोहोचवण्याचे आवाहनही करण्यात आले.

### एकाच दिवशी २७ हजार विद्यार्थ्यांना विद्युत सुरक्षा आणि ऊर्जा बचतीवर मार्गदर्शन

याशिवाय, वीज बचतीला प्रोत्साहन देण्यासाठी पंतप्रधान सूर्यघर मोफत वीज योजना, महावितरणच्या विविध स्मार्ट योजना आणि हरित ऊर्जा धोरणाची माहिती देण्यात आली. यामध्ये ई-व्ही (EV) धोरण, 'गो ग्रीन' योजना, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना व सौर कृषी पंप योजनेच्या माध्यमातून ऊर्जा स्वातंत्र्याकडे सुरू असलेल्या वाटचालीचा आढावा घेण्यात आला.

या संपूर्ण मोहिमेत शाखा अभियंत्यांपासून ते कार्यकारी अभियंत्यांपर्यंत एकूण १७३ अभियंत्यांनी प्रत्यक्ष सहभाग घेतला. मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी स्वत: कार्यकारी अभियंता बिपीन श्रीराव सोबत अमरावती येथील मार्डी रोडवरील नॅशनल असोसिएशन वेल्फेअर फॉर फिजीकल हँडिकॅप या संस्थेत उपस्थित राहून विद्यार्थ्यांशी संवाद साधला आणि या जनजागृती मोहिमेत योगदान दिले.

सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम

सोमवार दि. २१ सप्टेंबर २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## जिंतूर व पोहरादेवी येथील बंजारा समाजाच्या आमरण उपोषणाबाबत लवकर तोडगा काढावा

**वाशीमः** बंजारा समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी जिंतूर व पोहरादेवी येथे तरुणांचे आमरण उपोषण सुरू असून, या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी मोठ्या संख्येने समाजबांधव एकत्र येत आहेत. तसेच नांदेडसह राज्यात ठिकठिकाणी बंजारा समाजाचे आंदोलन सुरू आहे. हे आंदोलन चिघळू नये म्हणून शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी समाजाचे नेते तथा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्राद्वारे केली आहे.

बंजारा समाजाचे विविध संघटनेचे पदाधिकारी यांनी यवतमाळ येथे ना. संजय राठोड यांची भेट घेतली आणि या प्रश्नावर आपण व्यक्तीशः लक्ष घालावे व मा. मुख्यमंत्री यांच्या ही गंभीर बाब लक्षात आणून द्यावी, अशी विनंती केली. त्यांचे सर्व म्हणणे ऐकून घेतल्यानंतर ना. राठोड यांनी मुख्यमंत्री महोदयांना पत्र लिहून याकडे लक्ष वेधले. पत्रात ते म्हणतात, जिंतूर येथे वसंतराव नाईक यांच्या पुतळ्यासमोर श्री. विनोद आडे हे आमरण उपोषणास बसले आहेत. त्यांना पाठिंबा देण्यासाठी मोठ्या प्रमाणात लोक जमा होत आहेत. आडे यांनी आपल्यावर विनाकारण गुन्हा दाखल झाल्याचे व्हिडिओ व्हायरल करून सांगितले आहे.

## खदान मालकाची अतिरीक्त उत्खननातून मुजोरी...

# ‘स्वामीत्वधनाची’ कोट्यवधीची चोरी !

### * महसूल विभागाचे अर्थपूर्ण दुर्लक्ष * सर्व खदानीची ड्रोनद्वारे मोजणी करण्याची मागणी


मोंटो कार्लोत गौण खनिजाचे मोठे गौडबं...
* पोलीस, परिवहन पाठोपाठ गौण खनिज विभाग कंपनीच्या दावणीला * अकोला - नांदेड रस्त्याच्या का...
मोन्टो कार्लो कंपनीचे गौण खनिजाचे उत्...
मोन्टो कार्लो कंपनीच्या...
अवैध खनिजाचे ‘गौण’, अधिकाऱ्यांचे अर्थपूर्ण ‘मौन’!
मोन्टो कार्लो कंपनीची मनमानी...
अवैध गौण खनिजाच्या ‘खदानी’, पर्यावरणाची व महसुलाची ‘हानी’!
मोन्टोकार्लोच्या अवैध ब्लॉस्टींगमुळे...
घराला ‘तडे’, उडतात ‘खडे’!
मोन्टो कार्लो कंपनीचा ब्लॉस्टींगद्वारे...
अवैध उत्खनांचा ‘कारनामा’, अधिकाऱ्यांनी केला ‘पंचनामा’!
* अवैध उत्खननाची बाब उघड * कोट्यवधीच्या महसुलाची चोरी * कंपनीची मुजोरी
मोन्टो कार्लोचे अवैध उत्खनन सिध्द...
पंचनामा व ड्रोनद्वारे सर्व्हे होवूनही, दंडही नाही, कारवाईही नाही!
मोन्टो कार्लोची अवैध उत्खननातून....
शेकडो कोटीच्या महसूलाची ‘लूट’ अधिकाऱ्यांची अर्थपूर्ण ‘सूट’!
मोन्टो कार्लोच्या अवैध ब्लास्टींगमुळे...
तामसाळा येथील घराला ‘तडे’ कंपनीला शिकवा ‘घडे’!
मोन्टो कार्लोच्या अवैध उत्खननामुळे तामसाळावासी बाधीत...
साहेब, कारवाई करा, न्याय द्या!
मोन्टोकार्लोचे तामसाळा येथे अवैध उत्खनन सिध्द...
५ कोटी ८८ लाख रॉयल्टी भरा; अन्यथा १०६ कोटी रूपये दंड!

● अतिष देशमुख @ वाशीम ●

वाशीम जिल्ह्यामध्ये मागील ८/९ वर्षापासून समृध्दी महामार्ग आणि अकोला-नांदेड राष्ट्रीय महामार्गासह जिल्ह्यातील अनेक रस्त्याचे कामे मोठ्या प्रमाणात झाली. व इतरही रस्त्याचे कामे सुरू आहेत. या रस्त्याच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात गौण खनिजाची आवश्यकता असल्याने वाशीम जिल्ह्यातील सहाही तालुक्यातील ‘राजाश्रय’ असलेल्या सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी गौण खनिजाच्या खदानी सुरू केल्या आहेत. ‘त्या’ खदानीमधून नियमबाह्य व अवैधरित्या गौण खनिजाचे उत्खनन करून त्या सर्व खदान मालकाची परिस्थिती ‘सुजलाम-सुफलाम’ झाली असून शासनाच्या कोट्यवधी रूपयाच्या महसूलाला खदान मालकानी महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी संगणमत करून कोट्यवधीचा चुना लावल्याची चर्चा जनतेमध्ये आहे. जिल्ह्यातील सर्व गौण खनिज खदानीची ड्रोनद्वारे मोजणी केल्यास सत्य समोर येवून महसूलात वाढ होईल.







वाशीम जिल्ह्यात पाच वर्षापूर्वी मोजक्याच गौण खनिजाच्या खदानी होत्या. नंतर या व्यवसायातून करोडपती झालेल्या खदान मालकाचा आदर्श डोळयासमोर ठेवून जिल्ह्यातील सत्ताधारी व विरोधी पक्षाच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कमी कालावधीमध्ये ‘मालामाल’ करणाऱ्या या व्यवसायामध्ये पदार्पण योगायोगाने ८ वर्षापूर्वी वाशीम जिल्ह्यातून समृध्दी महामार्ग व अकोला-नांदेड राष्ट्रीय महामार्गाच्या कामाचा श्रीगणेशा झाला. या दोन्ही महामार्गासह जिल्ह्यातील अनेक महत्वाच्या रस्त्याची कामे सुध्दा सुरू झालीत. या सर्व रस्त्याच्या कामासाठी मोठ्या प्रमाणात गौण खनिजाची गरज असल्यामुळे या रस्त्याचे काम घेणारे कंत्राटदार व जिल्ह्यातील काही लोकांनी त्यांना सोयीचे ठिकाण असलेल्या जागेवर गौण खनिज खदानीचे महसूल विभागाकडून परवाने काढले. संबंधित लोकांनी व कंत्राटदारांनी ‘त्या’ खदानीतून नियम बाह्य व अवैधरित्या गौण खनिजाची उत्खनन केल्याचा प्रकार वाशीम तालुक्यातील तामसाळा येथे उघडकीस आला आहे. मोन्टो कार्लो कंपनीला वाशीमच्या तहसीदाराने अतिरीक्त अवैध उत्खनन केल्याप्रकरणी ४० कोटी रूपयाची रॉयल्टी भरण्याचे आदेश दिले होते. या कारवाईमुळे वाशीम तालुक्यातील महसूलाचे उदिष्ट पुर्ण झाले असले तरी वाशीम तालुक्यातील सर्वच गौण खनिजाच्या खदानीमध्ये क्षमतेपेक्षा जास्त नियमबाह्य व अवैधरित्या गौण खनिजाणचे उत्खनन झाल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केल्या आहेत. वाशीम, रिसोड, मालेगाव, मंगरूळपीर, मानोरा आणि कारंजा लाड, या सहाही तालुक्यातील सर्वच गौण खनिज खदान मालकांनी मागील ८ ते ९ वर्षात किती ब्रास गौण खनिज उत्खननाची ‘स्वामीत्वधनाची’ (रॉयल्टीची) रक्कम भरली आहे. आणि त्या खदानीतून किती ब्रास गौण खनिजाचे उत्खनन केले आहे. याची गौणद्वारे मोजणी करून जिल्ह्यातील सर्व गौण खनिजाच्या खदान मालकांनी शासनाचा किती कोटी रूपयाचा महसूलाला ‘चूना’ लावला ही बाब उघडकीस येणार आहे.

महसूल विभागातील जबाबदार अधिकाऱ्यांनी आपल्या वैयत्तीक स्वार्थाला बाजूला ठेवून वाशीम जिल्ह्यातील सर्व खदानीची ड्रोनद्वारे मोजणी करून सर्व खदान मालकांकडून त्यांनी चोरी केलेल्या रॉयल्टीची रक्कम दंड व्याजासह वसूल करण्यासाठी पुढाकार घ्यावा अशी जनतेची मागणी आहे.

## थोडक्यात

### पत्रकार रमेश मुंजे यांचा सत्कार

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●



मंगरूळपीर येथील देशमुख परिवारांनी सिटी न्यूज सुपरफास्ट मंगरूळपीर चे पत्रकार रमेश मुंजे यांना वाढदिवसानिमित्त आपल्या निवासस्थानी मिठाई खाऊ घालून पुष्पगुच्छ देऊन सन्मान केला. यावेळी श्री सुधाकर बापू देशमुख सौ देशमुख काकू या परिवारांचा जिव्हाळा पाहून मन भारावून गेले.

### मोकाट जनावरांचा रस्त्यावर ठिय्या;अपघाताला आमंत्रण

● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

मंगरूळपीर शहरात मो'या प्रमाणात- मोकाट गुरांचा सुसाट असून भर रस्त्यामध्ये आपले बस्तान मांडत असून नगरपालिकेचे याकडे दुर्लक्ष असून मुख्याधिकारी मोकाट गुरांमुळे अपघाताला आमंत्रण असून मोकाट गुरांना दोरखंड बांधाल का असा सवाल शहरवासीय कडून होत आहे . शहरात मोकाट जनावरे सामुहिक रित्या रस्त्याच्या मधोमध बसल्यामुळे अनेक अपघात घडले आहे. जनावरांचा बंदोबस्त करण्यासा'ी नगर पालिकेने पुढाकार घेवून जनावरांच्या मालकांवर कारवाई करावी अशी मागणी होत आहे. या जनावरांसा'ी कोंडवाड्याची सुविधा करावी.



## लुप्त होत चाललेल्या लावणी कलेला योगेश धावडे यांचा आधार;

# महिलेच्या वेशात सादर केली लावणी बहारदार !




● सिटी न्युज ब्युरो @ मंगरूळपीर ●

महाराष्ट्राच्या लोककलेची समृद्ध परंपरा असलेली लावणी आज बदलत्या मनोरंजनाच्या युगात हळूहळू लुप्त होत चालली आहे. अशा परिस्थितीत या कलेची परंपरा जिवंत ठेवण्यासाठी लावणीसम्राट योगेश धावडे (गोभणीकर) हे आपल्या अनोख्या सादरीकरणातून लावणी कलेची जोपासना करत आहेत. पुरुष असूनही महिलेचा वेश परिधान करून लावणी सादर करण्याची त्यांची कला रसिकांचे लक्ष वेधून घेत आहे.

शिवशक्ती गणेश मित्र मंडळाच्या पुढाकारातून काल रात्री गणेश मंडळासमोर विशेष लावणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी योगेश धावडे यांनी महिलेचा वेश परिधान करून बहारदार लावणी सादर केली. नृत्य, अभिनय, हावभाव आणि लावणीतील पारंपरिक अदाकारीचा सुरेख मिलाफ त्यांच्या सादरीकरणातून पाहायला मिळाला. गावकऱ्यांसह पंचक्रोशीतील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांच्या कलाविष्काराचा मनमुराद आनंद घेतला. त्यांच्या प्रत्येक सादरीकरणाला उपस्थित रसिकांकडून टाळ्यांचा कडकडाट आणि उत्स्फूर्त दाद मिळत होती. त्यामुळे गणेशोत्सवातील हा सांस्कृतिक कार्यक्रम उपस्थितांसाठी विशेष आकर्षण ठरला. विशेष म्हणजे योगेश धावडे यांनी नर्सिंगचे शिक्षण पूर्ण केले आहे. मात्र, केवळ शिक्षण आणि नोकरीपुरते मर्यादित न राहता त्यांनी आपल्या कलेलाच उदरनिर्वाहाचे साधन म्हणून निवडले आहे. नववीत शिक्षण घेत असतानाच ते लावणी कलेकडे वळले. तेव्हापासून आजपर्यंत त्यांनी या कलेची साधना सुरू ठेवली असून, नर्सिंगचे शिक्षण पूर्ण केल्यानंतरही लावणी कलेलाच आपल्या आयुष्याचा मार्ग बनवला आहे. ‘लावणी ही केवळ मनोरंजनाची कला नसून महाराष्ट्राच्या संस्कृतीचा ठेवा आहे,’ अशी भावना योगेश धावडे यांनी व्यक्त केली. बदलत्या काळात पारंपरिक लावणीला अपेक्षित व्यासपीठ मिळत नसल्याची खंत व्यक्त करत, ही कला पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्यासाठी आपल्याकडून शक्य तितके प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

पुरुष असूनही महिलेचा वेश परिधान करून लावणी सादर करण्यासाठी नृत्याबरोबरच अभिनय, हावभाव, ताल-लय आणि सादरीकरणातील बारकावे आत्मसात करावे लागतात. त्यासाठी सातत्याने सराव आणि कलेप्रती निष्ठा आवश्यक असल्याचेही धावडे यांनी सांगितले. लावणी कलेला व्यावसायिक स्वरूप देऊन उदरनिर्वाह करताना कलाकारांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याने शासनाने पारंपरिक लोककलावंतांसाठी मानधनाची व्यवस्था सुरू करून या कलेला प्रोत्साहन द्यावे, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

गणेशोत्सवाच्या माध्यमातून पारंपरिक लोककलेला व्यासपीठ देण्याचे काम शिवशक्ती गणेश मित्र मंडळाने केले. अशा कार्यक्रमांमुळे कलाकारांना प्रोत्साहन मिळण्यासोबतच नव्या पिढीलाही महाराष्ट्राच्या लोककलेची ओळख होते.

लुप्त होत चाललेल्या लावणी कलेला रसिकांची दाद आणि समाजाचे प्रोत्साहन मिळणे गरजेचे असून, शासनानेही कलाकारांना मानधन व आवश्यक व्यासपीठ उपलब्ध करून दिल्यास लावणीसारख्या पारंपरिक लोककला अधिक जोमाने जिवंत ठेवता येतील, अशी भावना व्यक्त होत आहे.

## श्री गुरुकृपा मल्टीस्पेशालिटी क्लिनिकतर्फे होमिओपॅथिक शिबिर

● सिटी न्युज ब्युरो @ वाशीम ●

समाजसेवक गिरीधरलालजी सारडा यांच्या वाढदिवसानिमित्त उद्या दिनांक २२ सप्टेंबर रोजी छत्रपती शिवाजी महाराज नगर, कोंडाळा रोड, सुंदरवाटिका, वाशिम येथील श्री गुरुकृपा मल्टीस्पेशालिटी क्लिनिकतर्फे होमिओपॅथिक शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या शिबिरात डॉ. राहुल अशोकरावजी देशमुख (BHMS, MD), Consulting Homoeopath यांच्याकडून रुग्णांना मार्गदर्शन व सल्ला देण्यात येणार आहे.






शिबिरामध्ये सर्दी, खोकला, ताप, ॲलर्जी, दमा, त्वचारोग, सांधेदुखी, पाठदुखी, महिलांच्या तक्रारी, लहान मुलांचे आजार, पचनाचे विकार, वारंवार होणारे आजार, मानसिक ताण-चिंता, अस्थमा तसेच दीर्घकालीन आजारांबाबत होमिओपॅथिक उपचार व मार्गदर्शन करण्यात येणार आहे. ‘निरोगी रहा. आनंदी रहा...’ या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाचा नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्री गुरुकृपा मल्टीस्पेशालिटी क्लिनिकतर्फे करण्यात आले आहे. शिबिरात सुरक्षित व प्रभावी उपचार, संपूर्ण व्यक्तीचा विचार आणि सर्व वयोगटांसाठी मार्गदर्शन उपलब्ध असल्याचे करण्यात आले आहे.

## वाशीम शहरातील व्यापारी संकुलातील...

# पार्किंगसह प्रसाधनगृहाच्या जागा गायब !

● सिटी न्युज ब्युरो @वाशीम ●

* जिल्हा व पालीका प्रशासनाचे दुर्लक्ष
* मुख्य बाजारपेठेसह प्रमुख चौकांमध्ये पार्कींग नसल्यामुळे नागरिकांना त्रास
* सनदी अधिकाऱ्यांनी पुढाकार घेवून शहरातील समस्या सोडवाव्यात







वाशीम शहरातील नगरपालीकेच्या आणि अनेक खासगी व्यापारी संकुलातील पार्किंगच्या जागेसह प्रसाधन गृहाच्या जागा गायब झाल्या आहेत. बहुतांश पार्किंग आणि प्रसाधन गृहाच्या जागेवर संबंधित व्यापारी संकुलाच्या मालकांनी दुकाने थाटली आहेत तर पालिकेने या प्रसाधन गृहाच्या जागा तत्कालीन पालिकेच्या सत्ताधारी पदाधिकाऱ्यांनी त्यांच्या निकटवर्तीयांना दिल्याची चर्चा आहे.

सध्या वाशीम पालिकेच्या मुख्याधिकारी पदाची सूत्रे परिविक्षाधीन सनदी अधिकारी अपूर्वा बासूर यांनी स्वीकारली असून आता त्यांनी पुढाकार घेवून वाशीम शहरातील पालीकेच्या व खासगी व्यापारी संकुलातील पार्किंग सह प्रसाधनगृहाच्या सर्व जागा मोकळ्या कराव्यात अशी शहरवासीयांची मागणी आहे.वाशीम शहरामध्ये सर्व प्रथम रविवार बाजारातील खुल्या जागेवर पालीके ने रस्त्याच्या दुतर्फा व्यापारी संकुल बांधले. या व्यापारी संकुलाच्या मध्यभागी असलेल्या रस्त्याच्या कडेला पालिकेने प्रसाधनगृहे बांधली होती. तेव्हा रविवार बाजारामध्ये मोठ्या प्रमाणात खुली जागा होती. आणि शहरात व ग्रामीण भागात वाहनांची संख्या पण मोजकी होती. कालांतराने वाशीम शहरातील बाजारपेठ वाढल्यामुळे पुन्हा २५ वर्षापूर्वी पालिका प्रशासनाने रविवार बाजार व बैलबाजाराच्या जागेवर बिओटी तत्वावर व्यापारी संकुल उभारण्यासाठी पुढाकार घेतला. महात्मा फुले मार्केट मध्ये पार्किंगची व्यवस्था व प्रसाधनगृहाची व्यवस्था न केल्यामुळे आज महात्मा फुले मार्केटमध्ये सर्वत्र घाणीचे साम्राज्य निर्माण झाल्याचे चित्र आहे. तसेच बैल बाजारातील व्यापारी संकुलाची सुद्धा हीच अवस्था आहे: या सर्व समस्या सोडविण्यासाठी आजपर्यंत पालिका प्रशासनाने व जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेतला नसल्याचा आरोप नागरिकांकडून केल्या जात आहे.

# ४०-४५ दिवसांपासून पावसाची दडी; शेतकरी संकटात !

### ‘लोकप्रतिनिधींनी बांधावर येऊन पाहणी करून शासनाकडे पाठपुरावा करावा व शेतकऱ्यांना मदत मिळवून द्यावी; अन्यथा लोकप्रतिनिधींच्या घरावर आंदोलन करू — दत्ता भांदुर्गे

●प्रभाकर नाईकवाडे @ केनवड●

मागील ४० ते ४५ दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील पिकांची अवस्था बिकट झाली आहे. सोयाबीनच्या शेंगा भरण्याच्या निर्णायक काळात पाऊस न झाल्याने अनेक ठिकाणी दाणे बारीक राहिले असून काही शेंगा करपल्या आहेत. त्यामुळे उत्पादनात मोठी घट होण्याची भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे.

मालेगाव तालुक्यातील मुंगळा गावाची ओळख ‘ऑरेंज व्हिलेज’ म्हणून आहे. मात्र याच गावातील संत्रा उत्पादक शेतकरी सध्या पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे मोठ्या संकटात सापडले आहेत. पावसाअभावी संत्र्याच्या झाडांना लागलेली फळे गळू लागली असून बागांचे नुकसान होत आहे. संत्रा बागांसाठी मशागत, खत, औषधफवारणी यावर मोठा खर्च करूनही आता उत्पादन धोक्यात आल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक संकट उभे राहिले आहे.



सोयाबीनसह इतर खरीप पिकांचीही परिस्थिती बिकट होत चालली आहे. त्यामुळे प्रशासन आणि लोकप्रतिनिधींनी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांची पाहणी करावी, नुकसानीचा आढावा घ्यावा आणि शासनाकडे मदतीसाठी ठोस पाठपुरावा करावा, अशी मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे.दरम्यान, सोशल मीडियावर दुष्काळग्रस्त तालुक्यांची कथित यादी मोठ्या प्रमाणात प्रसारित झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संभ्रम निर्माण झाला होता. या यादीत वाशिम, रिसोड आणि मालेगाव तालुक्यांचा समावेश नसल्याचे दाखवण्यात आले होते. मात्र १९ सप्टेंबर रोजी वाशिम जिल्ह्याच्या दौऱ्यावर आलेले कृषिमंत्री तथा पालकमंत्री दत्तात्रय भरणे यांनी शासनाने अशी कोणतीही अधिकृत दुष्काळग्रस्त तालुक्यांची यादी जाहीर केलेली नसल्याचे स्पष्ट केले.मात्र यादी खरी की खोटी, यापेक्षा शेतात उभ्या असलेल्या पिकांचे नुकसान शेतकऱ्यांसाठी अधिक महत्त्वाचे आहे. त्यामुळे मुंगळा परिसरातील लोकप्रतिनिधींनी तातडीने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन परिस्थिती जाणून घ्यावी आणि शासनाकडे मदतीसाठी प्रभावी पाठपुरावा करावा, अशी मागणी होत आहे.विशेष म्हणजे मागील वर्षी अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा पीकविमाही अद्याप अनेक शेतकऱ्यांना मिळालेला नसल्याची तक्रार आहे. त्यामुळे मागील वर्षाचा प्रलंबित पीकविमा आणि यंदाच्या पावसाच्या खंडामुळे झालेले नुकसान, या दोन्ही प्रश्नांवर शासनाने तातडीने निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.‘आता आश्वासन नको, प्रत्यक्ष मदत आणि ठोस निर्णय हवा,’ अशी भूमिका शेतकऱ्यांनी घेतली आहे. लोकप्रतिनिधींनी शेतकऱ्यांच्या बांधावर येऊन समस्या जाणून घेतल्या नाहीत आणि शासनाकडे प्रभावी पाठपुरावा केला नाही, तर लोकप्रतिनिधींच्या घरावर आंदोलन करण्याचा इशारा दत्ता भांदुर्गे यांनी दिला आहे. त्यामुळे मुंगळा परिसरातील शेतकऱ्यांचा संयम आता सुटत चालला असून, पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे निर्माण झालेल्या संकटात शासन आणि लोकप्रतिनिधी शेतकऱ्यांच्या मदतीला कधी धावून येतात, याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे.

## शिरपूर येथे मंगळवारपासून शंकरपट

● सिटी न्युज ब्युरो @ रिसोड ●

शिरपूर जैन येथे श्री औंढा नागनाथ गणेश मंडळाच्यावतीने शंकरपटाचे आयोजन मंगळवार व बुधवारी करण्यात आले.

येथील श्री औंढा नागनाथ गणेश मंडळाच्या वतीने स्थानिक श्री जानगीर महाराज संस्थानच्या कमानीजवळ भेरा रोड येथे शंकर पट होणार आहे.या स्पर्धेत विजेत्या बैल जोडीस भरभरून बक्षिसे दिली जाणार आहेत.मंगळवारी या सामन्याचे उद्घाटक म्हणून अशोक अंभोरे यांची तर पंन्यास प्रवर श्री परमहंसविजयजी महाराज यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.या शंकरपटात सर्वसामान्य गटातील बैलजोडीला प्रथम बक्षीस ११ हजार रुपये विजय अंभोरे यांच्याकडून देण्यात येणार आहे. दुसरे बक्षीस ७ हजार रुपये गणेश काळे यांच्यातर्फे, तिसरे बक्षीस ५ हजार रुपये व चौथे बक्षीस ४ हजार रुपये विशाल कदम यांच्याकडून तर दत्ता वाघमारे अडीच हजार रुपये देण्यात येईल.शब्बीरभाईकडून तीन हजार, प्रकाश अंभोरे, सोनू बोराटे व सागर बोराटे यांच्याकडून प्रत्येकी एकवीसशे, नागेश बोराटे दोन हजार, सागर चोपडे व दीपक काळे यांच्याकडून प्रत्येकी पंधराशे, राजू काळे, पिंटू जहिरव यांच्याकडून सुद्धा बक्षीस देण्यात येणार आहेत.



क गटासाठी पहिले बक्षीस ११ हजार रु कौशल जैन यांच्याकडून, दुसरे बक्षीस ७ हजार रुपये गजानन गावंडे यांच्यातर्फे, तिसरे बक्षीस ५ हजार रुपये पप्पू देशमुखकडून, चौथे बक्षीस ४ हजार रुपये सुनील घोडकेतर्फे, गणेश बळी अडीच हजार, यादव खोरने तीन हजार, ओंकार गावंडे व दीपक अंभोरे यांच्या कडून एकवीसशे, गजानन इंगोले, गजानन घिरके, राजू बाविस्कर, प्रदीप धामणकर, गणेश गाडे, अर्जुन चोपडेतर्फे दोन हजार रुपये देण्यात येईल.या स्पर्धेसाठी घड्याळ चालक विजू आवटे असतील. शेतकऱ्यांनी शंकरपटात आपल्या बैलजोड्या आणून या स्पर्धेचा आनंद घ्यावा असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले.

# जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्या...!



प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**खामगाव :** पावसाने दडी मारल्यामुळे जिल्ह्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीचा गांभीर्याने विचार करून तातडीने बुलडाणा जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा व शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून राज्याचे कृषी मंत्री ना. दत्तामामा भरणे यांच्याकडे करण्यात आली आहे.

कृषीमंत्री ना.दत्तामामा भरणे रविवारी (दि.२०) खामगाव तालुक्यातील पिंप्राळा येथे पिक परिस्थितीची पाहणी करण्यासाठी आले होते. यावेळी काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी कृषीमंत्र्यांची भेट घेवून घेराव घालत दुष्काळ परिस्थिती संदर्भात सविस्तर चर्चा केली व निवेदन सादर केले. निवेदनात नमुद आहे की, बुलडाणा जिल्ह्यात गेल्या दिड महिन्यापासून पावसाने दडी मारल्यामुळे गंभीर दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. पावसाअभावी शेतातील सोयाबीन, तूर तसेच इतर सर्व पिके सुकत असून नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे शेतकरी बांधवांसमोर मोठे आर्थिक संकट निर्माण झाले आहे. पिकांचे नुकसान, वाढता उत्पादन खर्च, कर्जाचा बोजा आणि उत्पन्नाचे साधन नसल्यामुळे शेतकरी अत्यंत अडचणीत सापडला आहे. या प्रतिकूल परिस्थितीमुळे काही शेतकरी बांधवांनी आत्महत्येसारखे टोकाचे पाऊल उचलल्याचेही निदर्शनास आले आहे. त्यामुळे शासनाने या गंभीर परिस्थितीची तातडीने दखल घेऊन बुलडाणा जिल्ह्यात कोरडा दुष्काळ जाहीर करावा तसेच कर्जमाफी जाहीर झालेली असली तरी विविध निकषांमुळे अनेक शेतकरी कर्जमाफीपासून वंचित राहिले आहेत. त्यामुळे सर्व थकीत शेतकऱ्यांना सरसकट कर्जमाफीचा लाभ द्यावा, शेतातील पिकांना आवश्यक पाणी उपलब्ध होण्यासाठी विद्युत पुरवठा दिवसभर व नियमित स्वरूपात करण्यात यावा, नादुरुस्त विद्युत डी.पी. (ट्रान्सफॉर्मर) विनाविलंब दुरुस्त करून वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यात यावा, पावसाअभावी झालेल्या पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना योग्य ती नुकसान भरपाई व आर्थिक मदत देण्यात यावी आदी मागण्या करण्यात आल्या आहेत. यावेळी खामगाव तालुका काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष तेजेंद्रसिंह चौहाण, नांदुरा कृउबासचे सभापती भगवान धांडे, खामगाव शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष स्वप्निल ठाकरे पाटील, ओबीसी विभागाचे सचिव अजय तायडे, काँग्रेस नेते कैलास फाटे, खामगाव शहर कार्याध्यक्ष किशोरआप्पा भोसले, प्रकाश इंगळे, गौरव गावंडे, पुरूषोत्तम झाल्टे, विनोद चव्हाण यांच्यासह काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचले कृषिमंत्री; पिंप्राळा येथे पीक परिस्थितीची केली पाहणी

## तातडीने अचूक पंचनामे करून बाधित शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करू – ना. दत्तात्रय भरणे



प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**बुलढाणा :** एल निनोच्या प्रभावामुळे पावसात पडलेल्या खंडामुळे शेतकरी अडचणीत सापडले आहेत. नुकसानग्रस्त एकही शेतकरी मदतीपासून वंचित राहू नये, यासाठी तातडीने व अचूक पंचनामे पूर्ण करून बाधित शेतकऱ्यांना सर्वतोपरी मदत करण्यात येईल. शासन शेतकऱ्यांच्या खंबीरपणे पाठीशी असून, भरीव मदत करण्यात येईल, अशी ग्वाही कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली. पावसातील खंड, अनियमित पर्जन्यमान आणि त्याचा पिकांच्या वाढीवर झालेला परिणाम यामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांच्या बांधावर पोहोचत कृषिमंत्री भरणे यांनी आज खामगाव तालुक्यातील पिंप्राळा येथे पीक परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी बाधित शेतकऱ्यांशी संवाद साधून पिकांची सद्यस्थिती, पावसातील खंडामुळे झालेला परिणाम तसेच त्यांच्या अडचणी जाणून घेतल्या.

नुकसानग्रस्त भागातील प्रत्येक पात्र शेतकऱ्याचा पंचनामा अचूकपणे होईल, याची प्रशासनाने दक्षता घ्यावी, असे निर्देश कृषिमंत्री भरणे यांनी दिले. शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, निश्चितपणे भरीव मदत करण्यात येईल. यंत्रणांनीही शेतकऱ्यांचे प्रश्न संवेदनशीलतेने सोडवून त्यांना दिलासा द्यावा, अशा सूचना त्यांनी दिल्या. "आम्ही सर्वजण शेतकऱ्यांचीच मुले आहोत. त्यामुळे बळीराजाचे दुःख आणि त्याचे नुकसान आम्ही समजू शकतो. संकटाच्या या काळात शेतकरी बांधवांनी खचून जाऊ नये. मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांच्या नेतृत्वाखाली शेतकऱ्यांना जास्तीत जास्त आणि थेट मदत पोहोचविण्यासाठी शासन खंबीरपणे कार्यरत आहे," अशी ग्वाही कृषिमंत्री भरणे यांनी दिली.

### पाणी, चारा आणि वीजपुरवठ्याला प्राधान्य

पीक नुकसानीसोबतच पिण्याचे पाणी, शेतीसाठी पाणीपुरवठा, जनावरांसाठी चारा आणि वीजपुरवठा या मूलभूत बाबींवर प्रशासनाने प्राधान्याने कार्यवाही करावी, अशा सूचना कृषिमंत्र्यांनी जिल्हा प्रशासनाला दिल्या. संकटग्रस्त शेतकऱ्यांच्या अडचणी कमी करण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. या पाहणीचा सविस्तर अहवाल तयार करून मुख्यमंत्री यांच्यासोबत होणाऱ्या बैठकीत सादर करण्यात येईल. त्यानंतर शेतकऱ्यांना आवश्यक मदत व दिलासा देण्यासाठी शासनस्तरावर योग्य निर्णय घेण्यात येईल, असा विश्वास ना. भरणे यांनी व्यक्त केला. या पाहणी दौऱ्यादरम्यान कामगार मंत्री आकाश फुंडकर, कृषी आयुक्त सुरज मांडरे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संतोष डांबरे , उपविभागीय अधिकारी रामेश्वर पुरी, तहसीलदार सुनील पाटील तसेच स्थानिक लोकप्रतिनिधी, जिल्हा प्रशासनातील अधिकारी,

# पावसाचे ढग विरले, टंचाईचे मळभ दाटले; विहिरींच्या उपशावर बंदी!

## संभाव्य पाणीटंचाईसाठी प्रशासनाची तयारी

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**खामगाव:** पावसाने दडी मारल्याने जिल्ह्यातील पाणीस्थितीवर आतापासूनच टंचाईचे सावट निर्माण झाले आहे. जिल्ह्यातील सर्व ९२ महसूल मंडळांत पावसाची तूट नोंदवली गेली असून, प्रकल्पांमध्ये सुमारे ६० टक्के जलसाठा आहे. खरीप हंगामातील पिकांवर परिणाम झाल्यानंतर आता पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांच्या संरक्षणाकडेही प्रशासनाने लक्ष केंद्रित केले आहे. पाणीपुरवठा व स्वच्छता विभागाने संभाव्य पाणीटंचाईचा सामना करण्यासाठी ऑक्टोबर २०२६ ते जून २०२७ या कालावधीसाठी टंचाई कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश दिले आहेत. पिण्याच्या पाण्याचे स्रोत सुरक्षित ठेवण्यासाठी भूजल उपशावरही निर्बंध आणण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. पिण्याच्या पाण्याच्या सार्वजनिक स्रोताच्या ५०० मीटर परिसरात पिण्याव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी नवीन विहीर खोदण्यास परवानगी देऊ नये, असे स्पष्ट करण्यात आले आहे.भूजल उपशावरही निर्बंध, नवीन विहीर खोदण्यास मनाई!पिण्याच्या पाण्याच्या सार्वजनिक सोतांच्या ५०० मीटर परिसरात पिण्याव्यतिरिक्त अन्य कारणांसाठी नवीन विहीर खोदण्यास परवानगी देऊ नये, असे निर्देश आहेत. त्याचबरोबर सार्वजनिक पिण्याच्या पाण्याच्या स्रोतांवर परिणाम होत असल्यास संबंधित विहिरींच्या भूजल उपशावर काही काळ नियंत्रण आणता येणार आहे.

### नऊ तातडीच्या उपाययोजनांना प्राधान्य !

टँकर वगळता विहीर खोल करणे किंवा गाळ काढणे, खासगी विहिरींचे अधिग्रहण, प्रगतीपथावरील पाणीपुरवठा योजना पूर्ण करणे, नळ योजनांची विशेष दुरुस्ती, विंधन विहिरींची दुरुस्ती, विंधन विहीर घेणे, बुडक्या घेणे आणि तात्पुरत्या पूरक नळ योजना अशा उपाययोजनांचा वापर करता येतो. शासनाच्या स्थायी मार्गदर्शक सूचनांमध्ये टंचाई निवारणासाठी अशा नऊ

### संभाव्य टंचाईग्रस्त गावे-वाड्यांची यादी तयार होणार!

भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेकडून पर्जन्यमान, भूजल पातळी आणि विहिरींची स्थिती लक्षात घेऊन संभाव्य टंचाईग्रस्त गावांची यादी तयार केली जाणार आहे. त्यानंतर तहसीलदार व गटविकास अधिकारी संयुक्तपणे गावांची पाहणी करून अहवाल जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर करतील

# लोकसंवाद-2026' : गणरायाच्या दर्शनासोबत आरोग्य, महसूल योजनांचा जागर



प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**बुलढाणा :** गणरायाच्या दर्शनासाठी एकत्र आलेल्या नागरिकांना शासनाच्या लोककल्याणकारी योजनांची माहिती देत त्यांना उपलब्ध सुविधांशी जोडण्याचा उपक्रम खामगाव येथील सती फैल परिसरातील हनुमान गणेशोत्सव मंडळात राबविण्यात आला.जिल्हा माहिती कार्यालयाच्या वतीने आयोजित 'लोकसंवाद-२०२६' उपक्रमांतर्गत आरोग्य व महसूल विभागाच्या विविध योजना, सुविधा आणि उपक्रमांची माहिती नागरिकांना देण्यात आली. राज्य शासनाने गणेशोत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केले आहे. या पार्श्वभूमीवर गणेश मंडळांच्या ठिकाणी मोठ्या संख्येने एकत्र येणाऱ्या नागरिकांशी थेट संवाद साधून शासनाच्या योजना, उपक्रम व धोरणात्मक निर्णयांची माहिती पोहोचविण्यासाठी जिल्ह्यात 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे. या उपक्रमांतर्गत डॉ. देवेंद्र भोपळे, वैद्यकीय अधिकारी, खामगाव, डॉ. श्वेता खेरडे, वैद्यकीय अधिकारी, अभिजीत जोशी, नायब तहसीलदार (निवडणूक) आणि मंडळ अधिकारी नितीन देशमुख यांनी आरोग्य व महसूल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती दिली. योजनांचा लाभ घेण्यासाठीची पात्रता, आवश्यक कागदपत्रे, अर्ज प्रक्रिया तसेच संबंधित विभागाशी संपर्क करण्याबाबत उपस्थित नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. 'गणरायाचे दर्शन आणि योजनांची माहिती' या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शासनाच्या योजना व नागरिकांसाठी उपलब्ध सुविधांची माहिती थेट मिळत असल्याबद्दल उपस्थितांनी समाधान व्यक्त केले. पात्र लाभार्थ्यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती घेऊन उपलब्ध सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन यावेळी करण्यात आले. कार्यक्रमास हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे अध्यक्ष चंद्रकांत रेठेकर, माजी नगरपरिषद उपाध्यक्ष दर्शनसिंह ठाकूर, हनुमान व्यायाम मंडळाचे माजी अध्यक्ष रजपालसिंह चव्हाण, डिगांबर गलांडे तसेच उपमाहिती कार्यालयाचे अनिल महल्ले आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री हनुमान गणेश मंडळाचे प्रसिद्धी प्रमुख अनुप गवळी यांनी केले. तर कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गणेशोत्सव समितीचे अध्यक्ष कृष्णाभाऊ ठाकूर, सचिव चेतन ठोंबरे यांच्या सह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# संजय गांधी योजनेचे रखडलेले अनुदान त्वरित द्या - जिल्हाधिकाऱ्यांकडे कलीम शेख यांची मागणी

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**मलकापुर:** अपंग जनता दल सामाजिक संघटनेचे राज्य सचिव कलीम शेख यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन निवेदन सादर केले. बुलढाणा जिल्ह्यातील अनेक दिव्यांगांच्या आधार कार्ड व दिव्यांग प्रमाणपत्रामध्ये नावात काही चुका झाल्या होत्या. त्या दुरुस्त करूनही आणि काही अस्थायी दिव्यांगांचे अनुदान बंद पडलेले आहे.शासनाने कायम दिव्यांगत्व तसेच अस्थायी दिव्यांगांना दिव्यांग प्रमाणपत्राच्या वैध तारखेपर्यंत लाभ देण्याबाबत शासन निर्णय निर्गमित करूनही, अनेक अस्थायी प्रमाणपत्र धारक दिव्यांगांना तसेच नाव दुरुस्त करूनही व आधार लिंक करूनही ५ ते ६ महिन्यांपासून लाभ मिळालेला नाही. बुलढाणा जिल्ह्यातील संबंधित तहसील कार्यालयातील संजय गांधी विभागात चौकशीअंती असे समजले की, संगणकीय डॅशबोर्डवर दिव्यांग व्यक्तीचे अकाऊंट इनॲक्टिव्ह असून, जोपर्यंत जिल्हा कार्यालयातून सदर अकाऊंट ॲक्टिव्ह होत नाही, तोपर्यंत लाभ सुरू करता येत नाही. तरी संबंधितांना आपल्या स्तरावरून निर्देश देऊन योग्य त्या दुरुस्त्या करण्याबाबत सूचित करण्यात यावे. चर्चा करतेवेळी कलीम शेख यांनी जिल्हाधिकारी यांना सांगितले की, मलकापूर तालुक्यात दि. ०५ मे २५ पासून ते आजपर्यंत दिव्यांग बांधवांचे एकही प्रकरण मंजूर झालेले नसून, जवळपास साडेचार महिन्यांपासून दिव्यांग बांधव हतबल झालेले असून, शासनाने ठरवून दिलेल्या महापुरुषांच्या जयंतीनिमित्त तसेच स्वातंत्र्य दिनी सभा घेण्याच्या उद्देशास हरताळ फासला जात असून दप्तर दिरंगाई होत असल्याचे स्पष्ट दिसत असून, संबंधितांना तातडीने सभा आयोजित करण्याबाबत सूचित करण्यात यावे.

# जानेफळमध्ये दंगा काबू पथकाची मॉक ड्रिल....



प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**मेहकर :** मॉक कॉल मिळताच जानेफळ पोलीस स्टेशनचे अधिकारी, अंमलदार आणि सैनिक तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन मेहकर डिव्हिजनचे RCP पथक तसेच मेहकर आणि डोणगाव पोलीस स्टेशनचे अधिकारी व अंमलदार यांनाही घटनास्थळी पाचारण करण्यात आले. आपत्कालीन परिस्थितीत वैद्यकीय मदत मिळावी यासाठी ॲम्बुलन्स, डॉक्टर आणि वैद्यकीय कर्मचारी यांचीही व्यवस्था करण्यात आली.

या मॉक ड्रिलच्या माध्यमातून पोलिसांची तत्परता, मनुष्यबळाची जमवाजमव, RCP पथकाचा समन्वय आणि संभाव्य दंगल परिस्थिती हाताळण्याची तयारी याची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. तसेच शांतता समितीच्या सदस्यांच्या उपस्थितीत दोन्ही गटांच्या प्रमुखांची बैठक घेऊन शांतता व सलोखा राखण्याचे आवाहन करण्याचे प्रात्यक्षिक करण्यात आले. जानेफळ शहरातील महत्त्वाच्या ठिकाणी फिक्स पॉईंट बंदोबस्ताची आखणीही करण्यात आली.

मॉक ड्रिलच्या माध्यमातून आपत्कालीन परिस्थितीला सामोरे जाण्यासाठी जानेफळ पोलीस यंत्रणा सज्ज असल्याचे दाखवून दिले.

# गॅरेज फोडून जुन्या बॅटऱ्या लांबवणाऱ्या चोरट्याला रंगेहात पकडले; एकावर गुन्हा दाखल, तर एक पसार





प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**मलकापूर:** येथील आठवडी बाजार परिसरातील वल्ली चौकातील एका ऑटो गॅरेजचे टीनपत्रे वाकवून आत प्रवेश करत जुन्या बॅटऱ्यांची चोरी करणाऱ्या दोन चोरट्यांपैकी एकाला स्थानिक नागरिकांनी रंगेहात पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले, तर त्याचा एक साथीदार अंधाराचा फायदा घेऊन पसार झाला. याप्रकरणी मलकापूर शहर पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मोहनपुरा येथील रहिवासी शेख महबूब शेख मुनीर यांचे वल्ली चौकात रॉयल ऑटो गॅरेज अँड स्पेयर पार्टचे दुकान आहे. १९ सप्टेंबर रोजी रात्री नेहमीप्रमाणे दुकान बंद करून ते घरी गेले असता, मध्यरात्री ४:३० वाजेच्या सुमारास त्यांना दुकानातून आवाज येत असल्याचा फोन आला. शेख महबूब यांनी तात्काळ भावासह दुकानाकडे धाव घेतली असता, दुकानाच्या मागील बाजूचे टीनपत्रे वर केलेले दिसून आले. संशय आल्याने त्यांनी आत जाऊन पाहिले असता दोन चोरटे दुकानातील साहित्य चोरताना आढळून आले. त्यांनी दोघांना पकडण्याचा प्रयत्न केला असता, त्यातील एक जण पळून गेला, तर दुसऱ्याला पकडण्यात यश आले. पकडलेल्या इसमाने आपले नाव शेख साबीर शेख अहमद रा.सायकलपुरा, मलकापूर असे सांगितले. तर पळून गेलेल्या साथीदाराचे नाव जावेदखान मुसाखान रा. सायकलपुरा असल्याचे निष्पन्न झाले. चोरट्यांनी दुकानातून ६ हजार रुपये किमतीच्या ३५ किलो वजनाच्या जुन्या बॅटऱ्या चोरल्याचे समोर आले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन आरोपीला ताब्यात घेतले. शेख महबूब यांच्या तक्रारीवरून मलकापूर शहर पोलिसांनी आरोपींविरूध्द अप.क्रं. ७००/२०२६ कलम ३०५, ३३१(४) बीएनएसएस प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस उपनिरीक्षक कुणाल जाधव करत आहेत.

# देवधाबा–बोदवड रस्त्याची दुरवस्था; खड्ड्यांच्या साम्राज्यामुळे नागरिक त्रस्त!



प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**मलकापूर:** जळगाव आणि बुलढाणा या दोन जिल्ह्यांना जोडणारा अत्यंत महत्त्वाचा मानला जाणारा देवधाबा ते बोदवड हा मुख्य मार्ग सध्या खड्डयांच्या साम्राज्यात हरवला आहे. रस्त्याची झालेली अत्यंत दयनीय अवस्था आणि खड्डयांची चाळण झाल्यामुळे या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना, शेतमजुरांना तसेच विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल होत आहेत.

हा रस्ता दोन जिल्ह्यांमधील व्यापारी, शेती आणि दैनंदिन दळणवळणाच्या दृष्टीने महत्त्वाचा दुवा आहे. मात्र, गेल्या काही काळापासून या रस्त्याची मोठी दुरवस्था झाली असून जागोजागी मोठे खड्डे पडले आहेत. यामुळे अपघातांचे प्रमाण वाढले असून वाहनांचेही मोठे नुकसान होत आहे. दररोज शाळेत व महाविद्यालयात जाणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच शेतात जाणाऱ्या मजुरांना आणि स्थानिक नागरिकांना या खराब रस्त्यामुळे नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे. एकीकडे लोकप्रतिनिधी आणि प्रशासन विकासाचे दावे करत असताना, दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या या मुख्य मार्गाकडे मात्र पूर्णपणे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. या समस्येची गंभीर दखल घेऊन संबंधित प्रशासनाने व लोकप्रतिनिधींनी तात्काळ या रस्त्याचे काम हाती घेऊन दुरुस्ती करून द्यावी, अशी जोरदार मागणी देवधाबा व बोधवड परिसरातील गावांमधील नागरिकांनी केली आहे.

# रविवार सुट्टीचा वार.... रात्री बारापर्यंत बाप्पाचा जयजयकार

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

अकोला: गणेशोत्सवातील सार्वजनिक सुटीचा शेवटचा दिवस असलेल्या रविवारी (२० सप्टेंबर) अकोला शहरात गणेशभक्तांची रेकॉर्डब्रेक गर्दी उसळली. पुढील चार दिवस नोकरी-व्यवसायाच्या धावपळीत कुटुंबासह गणेश दर्शनाची संधी कमी मिळणार असल्याने देखावे पाहण्यासाठी रविवारी सायंकाळपासूनच भाविकांनी गर्दी केली होती. रात्री उशिरापर्यंत दर्शनासाठी रांगा कायम होत्या.

विद्युत रोषणाई, सजीव देखाव्यांचे आकर्षण



गणेश मंडळांनी साकारलेली आकर्षक विद्युत रोषणाई, विविध देखावे, आणि सजीव आरास पाहण्यासाठी भाविक तास न् तास रांगेत उभे राहिले. मारवाडी प्रेस, लालबाग राजा, हरिहर पेठ चा राजा, लहरी गणेशोत्सव मंडळ, योगायोग गणेशोत्सव मंडळ, अर्जुन समाज गणेशोत्सव मंडळ, बालकराम गणेशोत्सव मंडळ सिंधी कॅम्प, कल्याण गणेशोत्सव मंडळ, विप्र समाज मंडळ, उमरी रोड चा राजा गणेशोत्सव मंडळ, शहीद चंद्रशेखर आझाद गणेशोत्सव मंडळ माळीपुरा, गौरक्षण रोड चा राजा, त्रिमूर्ती गणेशोत्सव मंडळ शास्त्रीनगर, कीर्ती नगरचा राजा, तेलीपुरा गणेशोत्सव मंडळ, एकता गणेशोत्सव मंडळ यांसह शहरातील विविध भागांमध्ये रात्रीपर्यंत गर्दीचा ओघ सुरूच होता.

### उत्सवी जल्लोष कायम

देखावे, रोषणाई आणि बाजारपेठांमधील गर्दीमुळे शहरात उत्सवी जल्लोष जाणवत होता. भाविकांच्या संख्येने दीड ते दोन लाखांचा टप्पा ओलांडल्याचा अंदाज मंडळांच्या कार्यकर्त्यांनी व्यक्त केला.

### सेल्फी, व्हिडिओचा ट्रेंड

देखावे पाहून झाल्यानंतर अनेकजण सेल्फी, फोटो, व्हिडिओ काढण्यासह रील्स तयार करताना दिसत होते.

### पायपीट करावी लागली

शहरातील अनेक मुख्य भागात वाहनांना प्रवेशबंदी होती. त्यामुळे नागरिकांना लांब कुठेतरी वाहने उभी करावी लागत होती. तेथून देखावे पाहण्यासाठी त्यांना पायपीट करावी लागली. गणपती पाहण्यासाठी लोक आपल्या परिवारासह बाहेर पडल्याने ऑटो चालकांची सुद्धा चांगलीच कमाई झाली.

# जिल्ह्यात ग्रामीण रस्त्यांचा प्रश्न अतिशय गंभीर; खड्ड्यांमुळे नागरिक हैराण

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**अकोला:** अकोला जिल्ह्यात ग्रामीण भागातील रस्त्यांची दुरवस्था अत्यंत बिकट झाली असून, खड्ड्यांचे साम्राज्य पसरल्यामुळे नागरिकांना दररोज प्रवासादरम्यान नाहक हाल-अपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.

अनेक दिवसांपासून या रस्त्यांची कोणतीही डागडुजी न झाल्यामुळे खड्डे की रस्ता, असा प्रश्न प्रवाशांना पडत आहे. यामुळे संतप्त झालेल्या ग्रामस्थांनी व



प्रवाशांनी प्रशासनाकडे हे रस्ते तातडीने दुरुस्त करण्याची जोरदार मागणी केली आहे.

जिल्ह्यातील मुख्य गावांपासून ते लहान-लहान पाड्यांना जोडणाऱ्या अनेक प्रमुख आणि अंतर्गत ग्रामीण रस्त्यांची पूर्णपणे वाट लागली आहे. पावसाळ्याच्या दिवसांत या खड्ड्यांमध्ये पाणी साचून त्यांना तळ्याचे स्वरूप प्राप्त होते, तर कोरड्या हवामानात धुळीच्या साम्राज्यामुळे वाहनधारकांना रस्ता शोधणे कठीण होते. या दुरवस्थेमुळे दुचाकी व चारचाकी वाहनांचे मोठे नुकसान होत असून, अनेक ठिकाणी गंभीर अपघात घडत आहेत.

# प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णसंख्येत वाढ...!

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**हिवरखेड:** प्राथमिक आरोग्य केंद्रात मोठ्या झपाट्याने रुग्ण सख्येची झ वाढ झाल्याचे चित्र दिसून येत आहे,मात्र काही रुग्णांना उपचारापासून व सुविधांपासून वंचित राहावे लागत आहे याकडे मात्र आरोग्य अधिकाऱ्यांसह लोकप्रतिनिधींचे दुर्लक्ष असल्याचे रुग्ण सांगत आहेत, तसेच गावात सबंधित प्रशासनाच्या वतीने मच्छर फवारणी सुद्धा झाली नाही वातावरणाच्या बदलावामुळे रुग्ण संख्येत वाढ होत असल्याचे सुद्धा समजते, काही रुग्णांनान मध्ये



ताप, मलेरिया, हातपाय गळून येणे, डोके दुखणे, सर्दी, खोकला, यांसह अनेक रुग्ण दवाखान्यात येत आहेत, मात्र काही रुग्ण सुविधा पासून दूर असल्याचे बोलतात, तर काही रुग्णांचा आरोप आहे, पेशंट कोणताही असो मात्र गोळी एकच गोर गरिबांनी उपचार घ्यावा तरी कोठे या गंभीर बाबीकडे वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तात्काळ लक्ष देण्याची गरज आहे.

# श्री रिद्धि सिद्धि गणेश उत्सव मंडळाच्या वतीने 'भजन जैमिंग संध्या' हा भक्तिमय कार्यक्रम

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**अकोला:** अकोला शहरातील रामनगर येथील श्री रिद्धि सिद्धि गणेश उत्सव मंडळाच्या वतीने नुकताच अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात 'भजन जैमिंग संध्या' हा भक्तिमय कार्यक्रम संपन्न झाला. बाप्पाच्या गजरात आणि मंगलमय वातावरणात पार पडलेल्या या कार्यक्रमाने संपूर्ण परिसरात चैतन्य निर्माण केले होते. या मनमोहक आणि आनंदमय संध्याकाळमध्ये रामनगर परिसरातील भावी भक्त व श्रद्धाळू मोठ्या संख्येने उपस्थित होते. भजनांच्या मधुर व कर्णमधुर धुनांवर सर्वजण भक्तिरसात पूर्णपणे तल्लीन होऊन कार्यक्रमाचा भरपूर आनंद



लुटताना दिसले. विशेष म्हणजे, या आध्यात्मिक सोहळ्याची शोभा वाढवण्यासाठी सिविल लाइन पोलीस स्टेशनच्या ठाणेदार मालती कायटे यांनी विशेष उपस्थिती लावली. त्यांच्या गरिमामयी आगमनाने आणि उपस्थितीने आयोजनाच्या उत्साहात भर घातली.या अध्यात्मिक आणि आनंदाच्या सोहळ्यात विशेष आकर्षण ठरले ते म्हणजे सिविल लाइन पोलीस स्टेशनच्या ठाणेदार मालती कायटे यांचे लाभालेले आगमन. त्यांच्या गरिमामयी व प्रेरणादायी उपस्थितीने या संपूर्ण आयोजनाची शोभा आणि मान अधिकच वाढवला. सिव्हिल लाईन्स पोलिस स्टेशन हद्दीत गुन्हेगारांवर वचक ठेवणाऱ्या, कोचिंग एरियामध्ये भयमुक्त वातावरण निर्माण केल्याबद्दल त्यांचा मंडळाच्या वतीने सत्कार करण्यात आला. बाप्पाच्या जयघोषात आणि आरतीच्या मंगलमय वातावरणात हा सोहळा अत्यंत उत्साहात पार पडला. मंडळाच्या वतीने उपस्थितांचे आभार मानण्यात आले. कार्यक्रमाच्या उत्तरार्धात आरतीचा मंगलमय सोहळा अत्यंत भक्तिभावाने पार पडला, ज्यामध्ये उपस्थितांनी मोठ्या श्रद्धेने सहभाग घेतला. या यशस्वी आयोजनाबद्दल श्री रिद्धि सिद्धि गणेश उत्सव मंडळाच्या वतीने उपस्थित सर्व नागरिकांचे, भक्तांचे आणि अतिथींचे हृदयपासून आभार मानण्यात आले. मंडळाला असाच स्नेह आणि सहकार्य भविष्यातही सतत लाभत राहावे, अशी अपेक्षा यावेळी आयोजकांनी व्यक्त केली.

# शहरातील कृत्रिम व नैसर्गिक गणेश घाटांवर आवश्यक उपाययोजना करा

प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**अकोला:** गणपती विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व भाविकांची गैरसोय होऊ नये, यासाठी अकोला महानगरपालिका क्षेत्रातील नैसर्गिक व कृत्रिम गणेश घाटांवर तत्काळ आवश्यक त्या सोयी-सुविधा आणि उपाययोजना पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश महापौर शारदा खेडकर यांनी प्रशासनाला दिले आहेत. तसेच विसर्जनाच्या वेळी भाविकांनी अर्पण केलेल्या निर्माल्याची मान-सन्मानाने विल्हेवाट लावण्यासाठी प्रत्येक गणेश घाटावर स्वतंत्र व सुस्थितीतील 'निर्माल्य वाहन' तैनात ठेवण्याचे विशेष आदेश त्यांनी दिले आहेत.

# लिनेस क्लब ऑफ अकोला तर्फे मासिक सभा व धार्मिक सहलीचे आयोजन





प्रतिनिधी २१ सप्टेंबर

**अकोला:** राष्ट्रीय, धार्मिक व सामाजिक सेवाकार्यात निरंतर अग्रेसर व गतिशील असलेल्या लिनेस क्लब ऑफ अकोला तर्फे तीन सप्टेंबर रोजी मासिक सभा व धार्मिक सहलीचे आयोजन हिवरा आश्रम, मेहकर येथे करण्यात आले. सर्व लिनेस सदस्यांनी मेहकर येथे बालाजीचे दर्शन व महाप्रसाद ग्रहण करून हिवरा आश्रमाकडे प्रस्थान केले. तेथे बोटिंगसह स्वामी विवेकानंद व स्वामी शुकदास महाराज समाधी मंदिरात सर्वांनी दर्शन घेतले. मनोरंजनाबरोबरच सामाजिक जागरूकतेला लक्षात घेऊन स्थानिक मूकबधिर विद्यालयात क्लब तर्फे ५,८०० रुपयांच्या इनडोअर व आऊटडोअर खेळण्यांचे वाटप करण्यात आले. या विशेष मुलांनी टाळ्या वाजवून आपला आनंद व्यक्त केला, हे पाहून आम्हाला सर्वांना संतोष वाटला.

क्लब तर्फे शाळेच्या पदाधिकाऱ्यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला, त्यांनीही आमच्या पदाधिकाऱ्यांचा या नैतिक कार्याबद्दल सन्मान केला. क्लबच्या परमनंट प्रोजेक्ट 'माँ से बेटी सवाई' अंतर्गत चार महिलांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर सर्व सदस्यांनी बालाजी मंदिराकडे प्रस्थान केले, जेथे आयोजकांतर्फे कृष्ण जन्मोत्सवात यशोदानंदाने बधाई देऊन मटकी फोड व सुंदर नृत्यासह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पवित्र श्रावण मासात कावड यात्रा काढून महादेवाच्या पिंडीला जलाभिषेक करण्यात आला. आश्रमातील गोशाळेत गाईंना ढेप चारा देण्यात आला.या सहलीच्या आयोजक -लि. सुलेखा गुप्ता, लि. गीता रुपारेलिया, लि. संजीवनी सर्जेराव, वंदना राव, लि. माया दिलोकार, लि. मंजुषा देशमुख, लि. पुष्पा डंगाइच व लि. पुष्पा जोडिया यांनी अतिशय सुनियोजित, सुव्यवस्थित व रचनात्मक पद्धतीने या प्रशंसनीय कार्याची अंमलबजावणी केली. वेळोवेळी चहा-नाश्ता व भोजनाची व्यवस्था लि. मोना पारेख व लि. रीना वोहरा यांनी केली.हाऊजी व प्रश्नमंजुषा स्पर्धेत सर्वांनी सहभाग घेऊन आनंद लुटला.

क्लब तर्फे घेण्यात आलेल्या स्वाक्षरी स्पर्धेत लि. रत्नमाला रूईकर व लि. रीना वोहरा विजयी ठरल्या. मेहकर बालाजी मंदिरात २,१००* व हिवरा आश्रमात २,५०० धनराशी क्लब तर्फे, तसेच १,८०० बोटिंग खर्च आयोजकांतर्फे करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डिस्ट्रिक्ट प्रेसिडेंट लि. कल्पनाताई देशमुख, लि. सुनंदाताई गुप्ता, पीडीपी लि. स्वाती झुनझुनवाला*, क्लब प्रेसिडेंट लि. राजश्री समनपुरे व इतर वरिष्ठ पदाधिकाऱ्यांचे मार्गदर्शन व सहकार्य लाभले. अशा प्रकारे दिवसभर लिनेस सख्यांसोबत वेळ घालवून सायंकाळी सकारात्मक ऊर्जा घेऊन सर्वजणी अकोल्याकडे रवाना झाल्या.

या सहलीत लि. राधा सराफ, लि. अर्चना पातुरकर, लि. अनिता उपाध्याय, सचिव लि. वनिता बिजवे, कोषाध्यक्ष लि. अलका उमाळे, लि. अनिता केडिया, लि. अनिशा वखारिया, लि. रूपल लोहिया, लि. स्वाती अग्रवाल, लि. उमा बाजोरिया, लि. प्रेमा मुंदडा, लि. शीतल अग्रवाल, लि. दिना शाह आदी उपस्थित होत्या.

# आधी वंदू तुज मोरया...



माऊली गणेश उत्सव मंडळ, जय हिंद चौकचा राजा



समाज सेवक गणेश मंडळ श्रीराम टॉवर



पोळा चौकाचा राजा गणेश मंडळ



राजराजेश्वर नगरीचा राजा किल्ला,चौक



हरिहर पेठचा राजा गणेश मंडळ



काळा मारुती गणेश मंडळ



श्री बालक गणेश उत्सव मंडळ सिंधी कँपचा राजा



बाल गणेश उत्सव मंडळ सिंधी कँप



युवा प्रतिष्ठान गणपती मंडळ जवाहर नगर चौक



श्री गणेश उत्सव मंडळ , देवराव बाबा चाळ,अकोला



चिंतामणी गणेश उत्सव मंडळ आकाशवाणी जवळ



श्री राम प्रतिष्ठान गणेश मंडळ सुधीर कॉलनी

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक प्रदीप पुंडलिकराव देशमुख यांनी सायरन ऑफसेट प्रिंटर्स एमआयडीसी क्र. २ पोलिस स्टेशन समोर ता. जि. अकोला येथे मुद्रित करून सिटी न्यूज सुपरफास्ट कार्यालय, उत्सव संकुल, गांधी रोड, अकोला येथे प्रकाशित केले.
■ मुख्य संपादक : प्रदीप पुंडलिकराव देशमुख ■ संपर्क - ०७२४ - २४३५५७३, २४४४७७४ ■ email- citynewss80@gmail.com, RNI No.- MAHMAR/ 2012 / 49642, RRC Helpline No. 8484842135